पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

मुंबई ■ वर्ष १ ■ अंक १७ ■ शनिवार, दि. २० जून २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

■ RNI No.- MHAR/ 26 /A4530 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# अमित शाह 2029 ला पंतप्रधान होण्याच्या तयारीत



प्रतिनिधी २० जून

**मुंबई :** आगामी लोकसभा निवडणुकीवेळी म्हणजे २०२९ मध्ये अमित शाह हे स्वत: पंतप्रधान व्हायची तयारी करत आहेत. त्यामुळेच ठाकरे गटाचे सहा खासदार हे थेट भाजपमध्ये न जाता शिंदे गटात गेले. या सगळ्यामागे अमित शाह यांना पंतप्रधान करण्याच्यादृष्टीने रणनीती आखण्यात आल्याचे वक्तव्य मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी केले. शनिवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात राज ठाकरे बोलत होते. यावेळी राज ठाकरे यांनी मनसेच्या कार्यकर्त्यांना २०२९ च्या



तयारीला लागण्याचे आदेश दिले. त्यादृष्टीने मतदार यादी आणि इतर बाबींवर लक्ष ठेवा, अशा सूचना राज ठाकरे यांनी मनसैनिकांना दिल्या.

यावेळी राज ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्या 'ऑपरेशन टायगर' संदर्भातही भाष्य केले. अमित शाह यांचा ग्रीन सिग्नल मिळाल्यानंतरच एकनाथ शिंदे यांनी 'ऑपरेशन टायगर' राबवले होते. त्यानुसार ठाकरे गटातील संजय जाधव, संजय देशमुख, संजय दिना पाटील, भाऊसाहेब वाकचौरे, ओमराजे निंबाळकर आणि नागेश आष्टीकर पाटील या सहा खासदारांना एकनाथ शिंदे यांनी गळाला लावले होते. या सगळ्या घडामोडींवर भाष्य करताना राज ठाकरे यांनी एका वेगळ्याच पैलूकडे सर्वांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. राज ठाकरे यांनी म्हटले की, ठाकरे गटाचे जे खासदार फुटले, त्याबाबत माझा एक प्रश्न आहे.

## महाराष्ट्राची वीज अदानींच्या घशात....

राज ठाकरे यांनी महावितरणच्या सद्यस्थितीवर एक अत्यंत धक्कादायक दावा केला. भारताच्या ऊर्जा मंत्रालयाने काढलेल्या एका अहवालानुसार, वीज वितरणात १०० पैकी महाराष्ट्राला केवळ १.५ गुण मिळाले आहेत. महावितरण आता लोकांमधून पैसे उभे करण्यासाठी आपला 'आयपीओ' आणत आहे. पण ज्या कंपनीला १०० पैकी फक्त दीड मार्क आहे, तिथे सर्वसामान्य माणूस का गुंतवणूक करेल? तिथे फक्त अदानीच गुंतवणूक करणार. एकदा का हे अदानींच्या हातात गेले की महाराष्ट्राची वीज कोण ठरवणार, तर फक्त अदानी. उद्या हे पाणीही ताब्यात घेतील. आपण काय गुलाम आहोत का? जनतेला केवळ आंदोलनांत गुंतवून ठेवून सिस्टीम ताब्यात घेण्याचे काम सुरू आहे.

# एक नगरसेवक अपात्र ?

प्रतिनिधी २० जून

**अकोला:** महापालिका निवडणूकीनंतर जात पडताळणी सहा महिन्यात करणे गरजेचे असते. अशा परिस्थितीत काँग्रेसच्या एका नगरसेवकांला धक्का बसल्याची माहिती समोर येत आहे. वाशिम जिल्हा जात पडताळणी समितीने या विषयीचा काही निकाल दिल्याची चर्चा महापालिका वर्तुळात आहे. पण, या विषयी अधिकृत दूजोरा कोणीच दिला नाही. त्याच बरोबर अकोल्यातील जात पडताळणी समिती अकोल्यात किती नगरसेवकांच्या जात वैधतेचा निकाल लागला याची माहिती मात्र मिळू शकली नाही. पण, अपात्र ठरलेल्या नगरसेवक कोण अशी विचारणा होत असून पुन्हा येथे निवडणुक कधी लागते याची चर्चा रंगली आहे.

# आता महिला बचत गटांना एका रूपयात मिळणार शासकीय जमीन!

प्रतिनिधी २० जून

**मुंबई :** राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना आणि प्रामुख्याने त्यांच्या विधवांसाठी फडणवीस सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आत्महत्याग्रस्त शेतकरी विधवांच्या महिला बचत गटांना आता विविध व्यवसाय व लागवडीसाठी शासकीय पडीक जमीन नाममात्र एका रूपयात उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या निर्णयाची घोषणा केली असून, यामुळे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला मोठी चालना मिळणार आहे.

हा निर्णय 'राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत' लागू करण्यात आला आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांमार्फत होणार जमिनींची निश्चिती

या योजनेच्या पारदर्शक आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी हे तहसीलदारामार्फत संबंधित तालुक्यांमधील शासकीय पडीक जमिनींची निश्चिती करणार आहेत. ही जमीन केवळ वैयक्तिक स्तरावर न देता, 'माविम', 'उमेद' अंतर्गत येणाऱ्या महिला बचत गटांना तसेच विविध ग्रामसंघांनाही वापरासाठी दिली जाणार आहे. फडणवीस सरकारच्या या निर्णयामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांतील महिलांना स्वतःचा उद्योग उभारण्यासाठी हक्काचे साधन उपलब्ध होणार आहे.

# पुराव्याअभावी सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता

प्रतिनिधी २० जून

**मुंबई:** राज्यातील बहुचर्चित आणि तब्बल २० वर्षांपासून न्यायालयात प्रलंबित असलेल्या पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड प्रकरणात मुंबई सत्र न्यायालयाने मोठा निकाल दिला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि राज्याचे माजी गृहमंत्री पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्वच्या सर्व आरोपींची न्यायालयाने पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. न्यायालयाने दिलेल्या या धक्कादायक निकालामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली असून, निंबाळकर कुटुंबासाठी हा फार मोठा धक्का मानला जात आहे. दीर्घकाळ चाललेल्या या खटल्यामध्ये न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद, साक्षीदार आणि पुरावे यांचा सखोल अभ्यास केला.

# शिक्षक चळवळीचे प्रणेते, शिक्षणतज्ज्ञ प्रा.बी.टी. देशमुख यांचे निधन

प्रतिनिधी २० जून

**अमरावती :** एक महान शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक नेते, माजी आमदार आणि महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी सदस्य असलेले प्रा. बी. टी. देशमुख यांचे शुक्रवार, १९ जून रोजी रात्री आठ वाजेदरम्यान हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या निधनाने शिक्षण जगतात, शिक्षक आणि संपूर्ण विदर्भात एक पोकळी निर्माण झाली आहे. त्यांचे पार्थिव कठोरा नाका नजीक असलेल्या त्यांच्या निवासस्थानावर अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आले आहे.



प्रा. बी.टी. देशमुख यांनी आपले संपूर्ण जीवन शिक्षणाच्या विकासासाठी, शिक्षक, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आणि उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी समर्पित केले होते. अमरावती पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत अनेक वेळा महाराष्ट्र विधान परिषदेवर निवडून आले होते. विधान परिषदेत त्यांनी कला, वाणिज्य, विज्ञान, आयुर्वेद, समाजकार्य आणि इतर व्यावसायिक शिक्षण संस्थांशी संबंधित शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न प्रभावीपणे आणि निर्भयपणे मांडले. एक अभ्यासू, विचारशील, स्वावलंबी, तत्त्वनिष्ठ आणि लोकहितासाठी समर्पित नेते म्हणून प्रा. बी.टी. देशमुख ओळखले जात होते. निवृत्तीनंतरही ते शिक्षणविश्वात मार्गदर्शक आणि प्रेरणास्त्रोत राहिले. त्यांच्या निधनामुळे शिक्षण विभागाची फार मोठी हानी झाली आहे. त्यांचे जीवन येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील.

प्रा. बी.टी. देशमुख यांच्या पार्थिवावर शनिवार, २० जून रोजी सायंकाळी पाच वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुली, जावई, नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# खाद्यतेल अभियानांतर्गत मिनी ऑईल मिलसाठी अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी २० जून

**अमरावती :** जिल्ह्यामध्ये सन २०२६-२७ या वर्षात सोयाबीन पिकासाठी 'राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया योजना' राबविण्यात येत असून, या योजनेअंतर्गत जिल्ह्यात 'मिनी ऑईल मिल (एक्सपेलर)' या घटकाचे लक्षांक प्राप्त झाले आहेत. पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा जास्तीत-जास्त प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेससह आणि मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेसशिवाय अशा दोन घटकांचा लाभ वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि मूल्य साखळी भागीदार गट यांना दिला जाणार आहे. कृषी यांत्रिकीकरण उपअभियानाच्या नियमांनुसारच लाभार्थ्यांची निवड केली जाईल आणि यासाठी महाडीबीटी पोर्टलवर शेतकऱ्यांनी सादर केलेल्या अर्जांमधून प्राधान्याने या योजनेसाठी लाभार्थी निवडले जाणार आहेत. या अभियानांतर्गत आर्थिक मर्यादेचा तपशील पाहता, मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेससह या घटकासाठी ४ लाख रुपये प्रति युनिट खर्च मर्यादा असून, युनिटच्या किमतीच्या ५० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेत, अथवा युनिटच्या किमतीच्या ४० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेत अनुदान देय राहील; तर मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेसशिवाय या घटकासाठी ३ लाख रुपये प्रति युनिट खर्च मर्यादा असून, यामध्येही युनिटच्या किमतीच्या ५० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेत, अथवा युनिटच्या किमतीच्या ४० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेत अनुदान उपलब्ध करून दिले जाईल.

# अवैध बांधकाम प्रकरणात 'खदान पोलिसांची' भूमिका संशयास्पद...!




## एसपींनी चौकशी करण्याची गरज

प्रतिनिधी २० जून

**अकोला:** हरिश अश्विन कॉलनीतील एस.आर.पाटील महाविद्यालयाच्या अवैध बांधकामावरील कारवाईवरून सध्या शहरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. महापालिकेचा अतिक्रमण निर्मूलन विभाग कारवाईसाठी तयार असताना, खदान पोलिसांनी मात्र एकामागून एक कारणे पुढे करत कर्तव्यात कमालीची कसूर केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात 'पोलीस दलातच पाणी मुरत' असल्याचा संशय बळावला असून, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेऊन खदान पोलिसांची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. अवैध बांधकाम पाडण्यासाठी पोलिस बंदोबस्तचे कारण पुढे करत ते टाळले जात असेल तर ही गंभीर बाब आहे. अकोला शहरात कुठलाही कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न नाही. अतिक्रमण आणि अवैध बांधकाम पाडण्यासाठी महापालिका नियमानुसार मागणी करत असताना ती का पुर्ण केल्या गेली नाही. शहरात इतका मोठा पोलिस कर्मचारी वर्ग असताना बंदोबस्त न देण्यामागे नेमके कारण काय. असा प्रश्न उपस्थित होतो.

### या संपूर्ण प्रकरणाचा धक्कादायक आणि संशयास्पद घटनाक्रम....!

**◆ ४ जून: 'एसपींचे निरीक्षण' असल्याचे पहिले कारण**

एस.आर.पाटील महाविद्यालयाचे अवैध बांधकाम पाडण्यासाठी महापालिकेने खदान पोलिसांकडे बंदोबस्त मागितला होता. मात्र, ४ जून रोजी 'पोलीस अधीक्षकांचे पोलीस स्टेशनला निरीक्षण आहे' असे कारण पुढे करत खदान पोलिसांनी बंदोबस्त देण्यास साफ नकार दिला आणि पहिली कारवाई हवेत विरली.

**◆ १७ जून (बुधवार - सकाळ): लेखी पत्र असूनही पोलीस गायब!**

बुधवारी (१७ जून) कारवाई करण्यासाठी खदान पोलिसांनी लेखी बंदोबस्त देण्याचे पत्र दिले होते. त्यानुसार महापालिकेचा अतिक्रमण निर्मूलन विभाग सकाळीच घटनास्थळावर दाखल झाला. मात्र, लेखी आश्वासन देऊनही खदान पोलिसांचा एकही जवान फिरकला नाही. महापालिका कारवाई करण्यास इच्छुक असताना पोलिसांच्या या दिरंगाईमुळे मनपा पथकाला हात हलवत ताटकळत उभे राहावे लागले.

**◆ १७ जून (बुधवार - दुपारी): '११२' वर कॉल केल्यावर पोलिसांची गुपचूप एन्ट्री**

पोलिसांच्या अनुपस्थितीमुळे अखेर स्थानिक नागरिकांनी '११२' या आपत्कालीन क्रमांकावर कॉल करून तक्रार केली. त्यानंतर काही पोलीस कर्मचारी तातडीने घटनास्थळी पोहोचले. पण, जर अधिकृत बंदोबस्त नाकारण्यात आला होता, तर ११२ च्या कॉलवर हे पोलीस कोणाच्या आदेशाने आले? आणि त्यांनी तिथे नेमकी काय भूमिका बजावली? हा आता मोठा शोधाचा विषय ठरला आहे.

### पुन्हा मागणी, आता कुठले कारण काढणार ?

खदान पोलिसांच्या असहकार्यानंतरही महापालिकेने माघार घेतलेली नाही. मनपाने पुन्हा एकदा या अवैध बांधकामावर हातोडा चालवण्यासाठी पोलीस बंदोबस्ताची मागणी केली आहे. मात्र, आता खदान पोलीस स्टेशन अतिक्रमण वाचवण्यासाठी पुढचे कुठले नवीन कारण शोधून काढणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एस.आर.पाटील महाविद्यालयाच्या अवैध बांधकामामागे नक्की कोणाचा वरदहस्त आहे ? खदान पोलीस मनपाच्या कारवाईत आडकाठी का घालत आहेत ? या सर्व घटनाक्रमाची आणि पोलिसांच्या संशयास्पद भूमिकेची निष्पक्ष चौकशी करून पोलीस अधीक्षक अर्चित चांडक दोषींवर कडक कारवाई करणार का, याकडे आता संपूर्ण अकोला शहराचे लक्ष लागले आहे.

# जिल्ह्यात पुरेसा जलसाठा उपलब्ध; पाटबंधारे विभागाची माहिती अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

प्रतिनिधी २० जून

**बुलढाणा :** जिल्ह्यातील जलसाठ्याबाबत प्रसिद्ध झालेल्या 'खडकपूर्णा प्रकल्प शून्यावर' तसेच '१३ प्रकल्प कोरडे' या वृत्तामुळे नागरिकांमध्ये जलटंचाईबाबत संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असल्याने पाटबंधारे विभागाने वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे. जिल्ह्यातील प्रमुख आणि मध्यम प्रकल्पांमध्ये उपयुक्त जलसाठ्यासह मोठ्या प्रमाणात मृत साठा उपलब्ध असल्याने सध्या पाणीटंचाईची परिस्थिती नसल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहितीनुसार, संबंधित वृत्तातील आकडेवारी ही केवळ उपयुक्त जलसाठा (लाईव्ह स्टोरेज) यावर आधारित असून धरणांमधील मृत साठा (डेड स्टोरेज) विचारात घेण्यात आलेला नाही. त्यामुळे काही प्रकल्प पूर्णपणे कोरडे असल्याचा निष्कर्ष वस्तुस्थितीशी सुसंगत नसल्याचे विभागाने म्हटले आहे. १७ जून २०२६ रोजीच्या आकडेवारीनुसार नळगंगा, पेनटाकळी आणि खडकपूर्णा या तीन मोठ्या प्रकल्पांमध्ये एकूण ७७.१२ दशलक्ष घनमीटर उपयुक्त जलसाठा उपलब्ध आहे.

# जिल्ह्यातील ४९८ ग्रामपंचायतींचे प्रारूप आरक्षण प्रसिद्ध; २५ जूनपर्यंत आक्षेप नोंदवण्याचे आवाहन

प्रतिनिधी २० जून

**अमरावती :** अमरावती जिल्ह्यातील एकूण ४९८ ग्रामपंचायतींचे प्रभागनिहाय प्रारूप आरक्षण आज, १९ जून २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे. संबंधित तहसील कार्यालय, गटविकास अधिकारी कार्यालय, तलाठी कार्यालय तसेच ग्रामपंचायत कार्यालय येथे रीतसर मुनादी (दवंडी) देऊन हे प्रारूप आरक्षण नागरिकांसाठी खुले करण्यात आले आहे. या प्रभागनिहाय प्रारूप आरक्षणामध्ये जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील ४४, वरूड ४३, दर्यापूर ४९, अंजनगाव सुर्जी ३४, अमरावती ४६, भातकुली ३६, नांदगाव खंडेश्वर ५१, चांदुर रेल्वे ३०, धामणगाव रेल्वे ५५, तिवसा ३०, मोर्शी ३९ आणि चांदुर बाजार तालुक्यातील ४१ अशा एकूण ४९८ ग्रामपंचायतींच्या आरक्षणाचा तपशील समाविष्ट आहे. दरम्यान, हे प्रारूप आरक्षण प्रसिद्ध झाल्यानंतर ज्या नागरिकांना यावर काही आक्षेप किंवा हरकती घ्यायच्या असतील, त्यांच्यासाठी २५ जून २०२६ ही अंतिम तारीख असणार आहे. शासकीय सुटीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत संबंधित तहसील कार्यालयात हे आक्षेप स्वीकारले जातील, तरी इच्छुकांनी विहित मुदतीत आपले आक्षेप नोंदवावेत, असे आवाहन उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांनी केले आहे.

# पोश कायदा व महिला सुरक्षा कायद्यांची कडक अंमलबजावणी करा

## राष्ट्रीय महिला आयोग अध्यक्षा विजया रहाटकर यांचे प्रशासनाला निर्देश

प्रतिनिधी २० जून

**बुलढाणा :** जिल्ह्यातील प्रत्येक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांचे शोषण रोखण्यासाठी आणि त्यांच्या सुरक्षेसाठी 'पोश' (POSH) कायद्यांतर्गत तक्रार समित्यांची तातडीने स्थापना करा, तसेच केंद्र व राज्य शासनाच्या सर्व महिलाभिमुख योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा, असे स्पष्ट निर्देश राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या महिला सुरक्षा, कायदे व विविध



कल्याणकारी योजनांच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, जिल्हा आरोग्य अधिकारी अमोल गिते, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे तसेच विविध विभागाचे विभाख प्रमुख उपस्थित होते.

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा (पोश अ‍ॅक्ट) च्या अंमलबजावणीबाबत बोलताना विजया रहाटकर म्हणाल्या की, ज्या संस्था किंवा आस्थापनांमध्ये १० पेक्षा जास्त कामगार कार्यरत आहेत, त्या सर्व ठिकाणी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. तसेच या समित्यांची नोंदणी 'शी-बॉक्स' (She-Box) पोर्टलवर करण्यात यावी. कौटुंबिक किंवा घरेलू काम करणाऱ्या महिलांच्या तक्रारींसाठी स्थानिक समितीमार्फत तातडीने न्याय मिळवून देण्यात यावा. या दोन्ही समित्यांनी अत्यंत तत्परतेने काम करावे आणि पीडित महिलांना न्याय द्यावा, असे निर्देश त्यांनी दिले.

बैठकीत महिलांविरुद्ध होणारे गुन्हे आणि जिल्ह्यातील सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. महिला सुरक्षेसाठी कार्यरत असणाऱ्या 'दामिनी पथका'ची गस्त अधिक प्रभावी करावी. जिल्हा संरक्षण अधिकाऱ्यांनी महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी अत्यंत तत्परतेने काम करावे. गंभीर गुन्ह्यांच्या बाबतीत पोलीस प्रशासनाने अधिक संवेदनशील राहावे आणि आपापसात समझोता करण्याच्या प्रवृत्तीवर कडक लक्ष ठेवावे, अशा सूचना त्यांनी पोलीस प्रशासनाला दिल्या. जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण पूर्णपणे शून्यावर आणण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वय ठेवून व्यापक मोहीम राबवावी, असे निर्देशही अध्यक्षांनी दिले.

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

शनिवार दि. २० जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## परफ्यूम वापरल्याने कॅन्सर होतो का?

परफ्युमचा नियमित वापर सुरक्षित मानला जात असला तरी त्याच्या अतिवापरामुळे त्वचा, डोळे आणि श्वसनसंस्थेशी संबंधित काही समस्या उद्भवू शकतात. अनेकांना परफ्युममुळे कर्करोग होतो का असा प्रश्न पडतो, मात्र सध्या याबाबत कोणताही ठोस वैज्ञानिक पुरावा उपलब्ध नाही. मात्र परफ्युममधील काही रसायनांमुळे त्वचेची अ?लर्जी, खाज, जळजळ, डोकेदुखी, शिंका आणि दम्याचा त्रास वाढू शकतो. नैसर्गिक अत्तर किंवा इसेंशियल ऑईल्सही सर्वांसाठी सुरक्षित असतीलच असे नाही. परफ्युमच्या वापराबाबत लोकांच्या मनात सर्वात मोठी भीती ही असते की, यामुळे कर्करोग होऊ शकतो का? परंतु, विज्ञानाचा आणि वैद्यकीय संशोधनाचा निष्कर्ष असा आहे की, नियमित परफ्युम वापरल्याने मानवामध्ये कर्करोग होतो, याचा कोणताही ठोस वैज्ञानिक पुरावा उपलब्ध नाही. जरी त्यातील काही प्रिझर्व्हेटिव्ह्ज किंवा सॉल्व्हेंट्सवर दीर्घकालीन संशोधने सुरू असली, तरी रोजच्या वापराचा कर्करोगाशी थेट संबंध जोडता येत नाही.

# लोकांना तांत्रिक आणि संघटनात्मक पायाभूत सुविधा पुरविणारी संस्था !

## विकिमीडिया फाउंडेशनचा आज स्थापना दिन

विकिमीडिया फाउंडेशनचा लोगो, ज्यामध्ये एक वर्तुळाकार रचना असून, त्यात एक पात्र उघडे पुस्तक धरून आहे आणि त्यावर 'विकिमीडिया फाउंडेशन' असा मजकूर आहे. विकिमीडिया फाउंडेशन, इंक ही एक अमेरिकन ना-नफा संस्था आहे, जिचे मुख्यालय सॅन फ्रान्सिस्को, कॅलिफोर्निया येथे आहे आणि तेथेच एक धर्मादाय संस्था म्हणून नोंदणीकृत आहे . ही संस्था जगातील सर्वाधिक भेट दिलेल्या वेबसाइटपैकी एक असलेल्या विकिपीडियाची यजमान म्हणून ओळखली जाते . ही संस्था चौदा संबंधित मुक्त सहयोग प्रकल्पांचे यजमानपदही भूषवते आणि त्या सर्वांचा आधार असलेल्या विकी सॉफ्टवेअर , मीडियाविकीच्या विकासाला समर्थन देते . या संस्थेची स्थापना २० जून २००३ मध्ये सेंट पीटर्सबर्ग , फ्लोरिडा येथे जिमी वेल्स यांनी केली होती , विकिपीडिया आणि इतर विकी प्रकल्पांना निधी देण्यासाठी एक ना-नफा मार्ग म्हणून .जे पूर्वी वेल्सची नफा-कमावणारी कंपनी बोमिसद्वारे होस्ट केले जात होते.

विकिमीडिया फाउंडेशन जगभरातील भाषांमध्ये विकी-आधारित सामग्री विकसित करण्यासाठी लोकांना तांत्रिक आणि संघटनात्मक पायाभूत सुविधा पुरवते. फाउंडेशन स्वतः प्रकल्पांवरील कोणतीही सामग्री लिहित नाही किंवा संपादित करत नाही. त्याऐवजी, हे काम विकिपीडियनसारख्या स्वयंसेवक संपादकांद्वारे केले जाते. तथापि, ते वैयक्तिक स्वयंसेवकांच्या नेटवर्क आणि विकिमीडिया चॅप्टर्स, विषय-आधारित संस्था, वापरकर्ता गट आणि इतर भागीदारांसारख्या संलग्न संस्थांसोबत सहयोग करते. ही संस्था प्रामुख्याने वाचक आणि संपादकांकडून मिळणाऱ्या लाखो लहान देणग्यांद्वारे स्वतःचा खर्च भागवते, ज्या ईमेल मोहिमा आणि विकिपीडिया व त्याच्या भगिनी प्रकल्पांवर लावलेल्या वार्षिक निधी संकलन बॅनरद्वारे गोळा केल्या जातात. याला परोपकारी संस्था आणि तंत्रज्ञान कंपन्यांकडून मिळणाऱ्या अनुदानाची आणि २०२२ पासून विकिमीडिया एंटरप्राइजकडून मिळणाऱ्या सेवा उत्पन्नाची जोड दिली जाते. २०२३ पर्यंत, या संस्थेने ७०० हून अधिक कर्मचारी आणि कंत्राटदारांना कामावर ठेवले आहे, तिची निव्वळ मालमत्ता २५५ दशलक्ष डॉलर्स आहे आणि तिचा स्थायी निधी १०० दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त झाला आहे.

जिमी वेल्स आणि लॅरी सँगर यांनी २००१ मध्ये न्युपीडियाला पूरक म्हणून विकिपीडियाची स्थापना केली. या प्रकल्पाला सुरुवातीला वेल्सच्या नफा-केंद्री व्यवसाय असलेल्या बोमिसकडून निधी दिला जात होता आणि स्वयंसेवक संपादकांच्या वेगाने वाढणाऱ्या समुदायाद्वारे त्याचे संपादन केले जात होते. सुरुवातीच्या समुदायाने देखभालीचा चालू खर्च भागवण्यासाठी विविध मार्गांवर चर्चा केली आणि साइटवर जाहिराती चालवण्यास त्यांचा व्यापक विरोध होता. त्यामुळे एक धर्मादाय संस्था स्थापन करण्याची कल्पना पुढे आली. त्यामुळे प्रकल्पाचे ट्रेडमार्क कोणत्या संस्थेकडे असावेत, या अनुत्तरित प्रश्नाचे निराकरण झाले.

विकिमीडिया फाउंडेशनची स्थापना २० जून २००३ रोजी सेंट पीटर्सबर्ग, फ्लोरिडा येथे झाली. सर्व्हर चालू ठेवण्यासाठी ऑक्टोबर २००३ मध्ये एक छोटी निधी उभारणी मोहीम राबवण्यात आली. २००५ मध्ये, यूएस अंतर्गत महसूल संहितेद्वारे फाउंडेशनला सार्वजनिक धर्मादाय संस्था म्हणून दर्जा देण्यात आला. ज्यामुळे फाउंडेशनला दिलेल्या देणग्या यूएस फेडरल आयकर उद्देशांसाठी कर-वजावटपात्र ठरल्या . त्याचा नॅशनल टॅक्सोनॉमी ऑफ एक्झम्प्ट एंटिटीज कोड बी ६० ( प्रौढ , निरंतर शिक्षण ) आहे. फाउंडेशनने १४ सप्टेंबर २००४ रोजी अमेरिकेतील पेटंट अपील आणि हस्तक्षेप मंडळाकडे विकिपीडिया नावाचा ट्रेडमार्क करण्यासाठी अर्ज दाखल केला. १० जानेवारी २००६ रोजी या चिन्हाला नोंदणीचा दर्जा देण्यात आला. १६ डिसेंबर २००४ रोजी जपानने आणि २० जानेवारी २००५ रोजी युरोपियन युनियनने देखील ट्रेडमार्क संरक्षण प्रदान केले. विकिपीडियाचे उपसंच आधीच पुस्तक आणि डीव्हीडी स्वरूपात वितरित केले जात होते आणि लोगो आणि वर्डमार्कचे परवाना देण्याबद्दल चर्चा सुरू होती. ११ डिसेंबर २००६ रोजी, फाउंडेशनच्या मंडळाने नमूद केले की, फ्लोरिडाच्या वैधानिक कायद्याच्या नोंदणी आवश्यकता पूर्ण करण्यात असमर्थतेमुळे, सुरुवातीला नियोजित केल्याप्रमाणे परंतु अंमलात न आणलेल्या, सदस्यत्व संस्था बनू शकली नाही. त्यानुसार, सदस्यत्वाचे हक्क आणि उपक्रमांचे सर्व संदर्भ काढून टाकण्यासाठी उपनियमांमध्ये सुधारणा करण्यात आली. २००७ मध्ये, फाउंडेशनने आपले मुख्यालय फ्लोरिडाहून सॅन फ्रान्सिस्को बे एरियामध्ये हलवण्याचा निर्णय घेतला . सॅन फ्रान्सिस्को निवडण्यामागे समान विचारसरणीच्या संस्था आणि संभाव्य भागीदारांची जवळीक, उत्तम प्रतिभावान मनुष्यबळ, तसेच स्वस्त आणि अधिक सोयीस्कर आंतरराष्ट्रीय प्रवास ही कारणे सांगितली गेली. हे स्थलांतर ३१ जानेवारी २००८ पर्यंत पूर्ण झाले आणि सॅन फ्रान्सिस्कोमधील स्टिलमन स्ट्रीटवरील मुख्यालयात हलवण्यात आले. नंतर ते न्यू माँटगोमेरी स्ट्रीटवर आणि २०१७ मध्ये वन माँटगोमेरी टॉवरमध्ये स्थलांतरित झाले. २५ ऑक्टोबर २०२१ रोजी, फाउंडेशनने विकिमीडिया एंटरप्राइज सुरू केले, जी मोठ्या प्रमाणात एपीआय वापरू इच्छिणाऱ्या गटांसाठी असलेली एक व्यावसायिक विकिमीडिया सामग्री वितरण सेवा आहे, ज्याची सुरुवात बिग टेक कंपन्यांपासून झाली. जून २०२२ मध्ये, गूगल आणि इंटरनेट आर्काइव्ह यांना या सेवेचे पहिले ग्राहक म्हणून घोषित करण्यात आले, तथापि या सेवेसाठी फक्त गूगलच पैसे देणार आहे. त्याच घोषणेमध्ये, समान डेटा गरजा असलेल्या लहान कंपन्यांवर लक्ष केंद्रित केले जात असल्याचे नमूद केले गेले, जे 'थोडे पैसे देऊन जास्त' या तत्त्वावर सेवेला समर्थन देत आहेत.

विकिमीडिया फाउंडेशनची स्थापना २००३ मध्ये जिमी वेल्स यांनी केली होती, जेणेकरून कंपनी डोमेन आणि ट्रेडमार्कसाठी जबाबदार असलेली एक स्वतंत्र धर्मादाय संस्था असावी आणि भविष्यात विकिपीडिया आणि त्याच्या भगिनी प्रकल्पांना ना-नफा मार्गाने निधी दिला जाऊ शकेल. 'विकिमीडिया' हे नाव, जे 'विकी' आणि 'मीडिया' यांचे मिश्रण आहे, अमेरिकन लेखक शेल्डन रॅम्पटन यांनी मार्च २००३ मध्ये इंग्रजी विकिपीडिया मेलिंग लिस्टवरील एका पोस्टमध्ये तयार केले होते, विक्टनरी मूळ सर्व्हरवर होस्ट केलेला दुसरा विकी-आधारित प्रकल्प बनल्यानंतर तीन महिन्यांनी. फाउंडेशनचे ध्येय विनामूल्य परवाने किंवा सार्वजनिक डोमेन अंतर्गत शैक्षणिक ज्ञानाचे संकलन आणि वितरण करणे आहे आणि हे प्रकल्प विनामूल्य ठेवण्याचे वचन दिले आहे. विकिपीडियाच्या स्थापनेनंतर, विकिपीडियाबद्दलचे सर्व बौद्धिक संपदा हक्क आणि डोमेन नावे फाउंडेशनकडे हस्तांतरित करण्यात आली, आणि सध्या ते डोमेन नावांचे मालक आहे आणि विकिमीडिया चळवळीच्या बहुतेक वेबसाइट्सची देखभाल करते. डब्ल्यूएमएफ आता 'विकिपिडीयाडॉट ओआरजी' डोमेनचे नोंदणीकर्ता, ट्रेडमार्कचे मालक आणि विकी प्लॅटफॉर्मचे संचालक आहे. ते विकीबुक्स , विकीडेटा , विक्टनरी आणि विकिमीडिया कॉमन्स सारखे प्रकल्प चालवते ; ते निधी उभारते, अनुदान वितरित करते, सर्व्हर नियंत्रित करते, सॉफ्टवेअर विकसित आणि तैनात करते आणि इंग्रजी विकिपीडियासह विकिमीडिया प्रकल्पांना समर्थन देण्यासाठी पोहोच कार्यक्रम करते. ते कॉपीराइट, प्रेस स्वातंत्र्य आणि वापरकर्त्यांच्या सामग्रीशी संबंधित दायित्वापासून वेबसाइट्सच्या कायदेशीर संरक्षणासंदर्भात राजकीय वकिलीमध्ये देखील गुंतलेले आहे.

## आदरणीय बी.टी. देशमुख सर म्हणजे एक चालते बोलते विद्यापीठ !



ज्ञानाचे भांडार ! विद्वत्तेचा महामेरू ! सध्याच्या गढूळ आणि घाण झालेल्या राजकारणात बी.टी. देशमुख सरांचे प्रतिबिंब आणखी उजळून दिसते. सतत पाच वेळा महाराष्ट्राच्या विधान परिषदेमध्ये निवडून जाऊन देशामध्ये विक्रम करणारे बी टी देशमुख सर हे महाराष्ट्र विधिमंडळातील अनमोल रत्न होते. महाराष्ट्राच्या स्थापनेपासून आतापर्यंत झालेल्या विधिमंडळाच्या मोजक्या अभ्यासू आमदारांपैकी बी टी देशमुख सर हे एक सदस्य होते. विषय कोणताही असो; परंतु त्या विषयामध्ये अतिशय खोलात जाऊन, सखोल अभ्यास करून सभागृहात मांडणी करणारे बी. टी. देशमुख सर यांचा आदर्श आजचे लोकप्रतिनिधी घेऊ शकणार नाही याची आम्हाला परिपूर्ण जाणीव आहे. परंतु ज्यांना खरोखर लोकनेता व्हायचे आहे आणि सभागृहात मंत्री, मुख्यमंत्र्यावर आपला वचक आणि दबाव निर्माण करायचा आहे त्यांच्यासाठी बी. टी. देशमुख यांच्यासारखे दुसरे उदाहरण नाही. विदर्भाचा अनुशेष असो की महाराष्ट्रातला कोणताही प्रश्न असो; शेती, शिक्षण, धरणे, रस्ते, जंगल, आरोग्य,उद्योग व्यवसाय एकही विषय बी. टी.देशमुख सरांच्या अभ्यासपूर्ण मांडणीतून सुटला नाही.इतका व्यासंगी,इतका अभ्यासू, इतका विद्वान आमदार आजच्या काळात महाराष्ट्राच्या विधिमंडळात एकही नाही हे कोणीही नाकारू शकत नाही.सतत तीस वर्ष वरिष्ठ सभागृहाचे आमदार राहूनही कधीही एक रुपयाच्या भ्रष्टाचाराचा आरोप न झालेले,स्कूटरने फिरणारे बी टी सर गाडगेबाबा,तुकडोजी महाराज,डॉ. भाऊसाहेब देशमुख यांच्या विचारांवर चालणारे खरे समाजसेवक होते.आज अमरावती जिल्ह्यात उठता बसता गाडगेबाबा, तुकडोजी महाराज,पंजाबराव देशमुख यांचे नाव घेणारे सर्वच पक्षाचे लोकप्रतिनिधी आहेत.परंतु या संत महापुरुषांचे कोणतेही विचार मात्र या जनप्रतिनिधींच्या आचरणातून आपल्याला दिसून येत नाही.उलट या विचारांच्या विरोधात त्यांचे आचरण असते.अशावेळी बी. टी. सरांची आम्हाला आवर्जून आठवण येते.आमदार कसा असतो आणि तो कसा असावा याचा नवीन पिढीला अभ्यास करायचा असेल तर मा.बी. टी. देशमुख यांचे उदाहरण पुरेसे आहे.अशा या समाजसेवी वृत्तीच्या, विधिमंडळात आपला दरारा निर्माण करणाऱ्या,महान संसदपटू म्हणून अनेकदा गौरवांकित झालेल्या, महाराष्ट्राचे वैभव असलेल्या,अमरावती जिल्ह्याच्या या महान सुपुत्राचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.आदरणीय बी.टी.देशमुख सर आज आपल्यात नाहीत. त्यांच्यातली अभ्यासू आणि व्यासंगी वृत्ती थोडीफार जरी आजच्या सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी आपल्या अंगी बाणवली तर तीच खरी स्मृतीशेष बी. टी.सरांना आदरांजली ठरेल.

विनम्र अभिवादन!

**प्रेमकुमार बोके,** अंजनगाव सुर्जी



## स्वच्छतेची जबाबदारी सामूहिक आहे

गाव, शहर आणि महानगरातील, स्वच्छतेचा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. रस्त्यावर साठलेला कचरा, तुंबलेल्या नाल्या, गटार त्यामुळे रस्त्यावर वाहणारे पाणी, पसरलेली दुर्गंधी याविषयीच्या बातम्या आणि फोटो आपण दररोज वृत्तवाहिन्यांवर बघतो आणि वृत्तपत्रातून वाचतो. या बद्दल नागरिक नेहमी प्रशासनाचा हलगर्जीपणा आणि सफाई कामगारांच्या कामचुकारपणा बद्दल ओरडा करतात. हे काही अंशी खरे असले तरी पुर्ण सत्य नाही. कारण प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. हि झाली एक बाजू, आता दुसरी बाजू बघू. स्वच्छता हा अतिशय कळीचा मुद्दा आहे. स्वच्छतेमुळे वातावरण प्रसन्न होऊन, सकारात्मक उर्जा निर्माण होते. महत्वाचे म्हणजे स्वच्छतेवर नागरिकांचे आरोग्य अवलंबून असते. याउलट अस्वच्छतेमुळे गाव, शहर आणि महानगराची प्रतिमा मलीन होते, पर्यावरणाचे नुकसान होऊन, नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होतो. महान समाजसुधारक संत गाडगेबाबा स्वतः हातात झाडू घेऊन, गावातील गल्ल्या आणि सार्वजनिक स्थळांची स्वच्छता करत. ' स्वच्छता हिच ईश्वर सेवा आहे ', ' भुकेल्याला अन्न आणि ताहानलेल्याला पाणी ', हा बाबांचा मुलमंत्र होता. संत गाडगे बाबांच्या कार्याने प्रेरित होऊन, तसेच त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र शासनाने वर्ष २००० - २००१ पासून ' संत गाडगे बाबा स्वच्छता अभियान', राबविण्यास सुरुवात केली. त्याचप्रमाणे २ ऑक्टोबर २०१४ पासून केंद्र सरकार 'देखील ' स्वच्छ भारत ', अभियान राबवित आहे. शासन वेळोवेळी स्वच्छता आणि त्याच्याशी निगडीत असलेल्या नागरिकांच्या आरोग्या संबंधी विविध अभियान राबवते. रस्त्याची सफाई करण्यासाठी, तसेच नाल्यांत डास आणि जंतू नाशक द्रव्यांची फवारणी करण्यासाठी आधुनिक मशीन, कचऱ्याची उचल करण्यासाठी, कचरा घंटा गाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. शासन कचऱ्याचा पुनर्वापर करण्यावर जोर देत आहे. या दृष्टीने काही प्रकल्प देखील सुरु करण्यात आले आहेत. विविध प्रकारच्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्या बाबत, शासना तर्फे नागरिकांना वेळोवेळी आवाहन करण्यात येते. त्या अनुषंगाने सर्व सुज्ञ नागरिकांनी आपल्या घरातील तसेच व्यवसायिक प्रतिष्ठानातील कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावणे अपेक्षित आहे. काही नागरिक याचे काटेकोरपणे पालन करतात.

**-हेमंत जकाते, अकोला**

## दिन विशेष

### भारतातील आद्य पक्षीशास्त्रज्ञ आणि पर्यावरणवादी डॉ. सलीम अली



आज पुण्यतिथी

डॉ. सलीम अली म्हणजेच सलीम मोईझुद्दीन अली यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८९६ तर मृत्यू २० जून १९८७ झाला. ते हे भारतातील आद्य पक्षिशास्त्रज्ञ आणि पर्यावरणवादी होते. सलीम अली यांनी भारतातील ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतातील पक्ष्यांचा आढळ, त्यांच्या सवयी, पक्ष्यांच्या विविध जाती आणि जातींमधील वैविध्य यांचा बारकाईने अभ्यास केला. त्यांच्या ह्या कार्याने भारतात हौशी पक्षिनिरीक्षक बनण्याची परंपरा चालू झाली. भारतातील हे पक्षी निरीक्षक सलीम अली यांना आद्य गुरूमानतात. त्यांना 'बर्डमॅन ऑफ इंडिया' असे ही संबोधले जाते.

पिवळ्या गळ्याची चिमणी; हिच्या शिकारीने डॉ. अलींना पक्ष्यांबद्दल आकर्षण निर्माण झाले. डॉ. सलीम अली आपण पक्षी निरीक्षणाकडे कसे वळलो याचे वर्णन आपल्या आत्मचरित्रात करतात. मुंबईच्या खेतवाडीमध्ये मुस्लिम कुटुंबात अली यांचा जन्म झाला. लहानपणी भेटवस्तू म्हणून दिलेल्या छऱ्याच्या बंदुकीने लहान पक्षी टिपायचे हा त्यांचा छंद होता. एके दिवशी टिपलेल्या चिमण्यांमध्ये त्यांना वेगळी चिमणी मिळाली. हिच्या गळ्यापाशी पिवळा ठिपका होता. नेहेमीपेक्षा हा पक्षी वेगळा दिसल्याने त्यांची उत्सुकता चाळवली व त्यांनी त्यांच्या मामांकडे हा पक्षी कोणता याची विचारणा केली. मामा त्याला थेट बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीच्या संचालकांकडे घेऊन गेले. तेथे संचालकांनी छोट्या अलीला हा पक्षी कोणता हे सविस्तर सांगितले, तसेच भुसा भरलेल्या पक्ष्यांचा संग्रह दाखवला. भारावललेल्या सलीम अलींना पक्ष्यांची जी भुरळ पडली ती कायमचीच. यानंतरच्या काळात सलीम अलींचा पक्षिछंद त्यांना टिपणे व नोंदी करणे यांपुरता मर्यादित राहिला. शालेय शिक्षणानंतर त्यांना प्राणी शास्त्रात पदवी घ्यायची होती परंतु शास्त्रातील अनेक अवघड विषयांमुळे माघार घ्यावी लागली. दरम्यान ते ब्रम्हदेशातील आपल्या बंधूंच्या धंद्याला मदत म्हणून रंगूनला गेले. तेथे धंद्यात मदतीसोबत त्यांनी ब्रम्हदेशातील जंगले फिरून पक्ष्यांना टिपून त्यांच्या नोंदी ठेवायचा छंद चालू ठेवला. १९१८ मध्ये त्यांचा तेहमिना यांच्यांशी विवाह झाला. एका यशस्वी पुरुषामागे पत्नीचा हात असतो ही म्हण सलीम अलींच्या बाबतीत तंतोतंत लागू होते. १९२४ मध्ये रंगून मधील धंद्यात अपयश आल्यानंतर अली भारतात परत आले. दरम्यान तेहमिना यांनी सलीम अलींचा पक्ष्यांबद्दलचा कल जाणून घेतला होता व ज्यात त्यांचा छंद जोपासला जाईल अशी नोकरी करण्यास त्यांना प्रोत्साहन दिले. परंतु सलीम अलींचे शिक्षण अशी नोकरी मिळवण्यास एकदम जुजबी होते. जवळच्या ओळखीने त्यांना बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीमध्ये गाईड लेक्चररची नोकरी मिळाली, परंतु अलींना ते पुरेसे नव्हते. त्यावेळेस भारतात पक्षिशास्त्र हा विषय अस्तित्वातच नव्हता. यासाठी त्यांनी जर्मनीमध्ये जाऊन पक्षिशास्त्राचे प्रशिक्षण घेतले व काही काळ इंग्लंडमध्ये काम केले. भारतात आल्यानंतर या विषयात नोकरी मिळणे कठीण काम होते. सलीम अली अजूनही हौशी पक्षी निरीक्षकांसारखेच गणले जात. आर्थिक परिस्थिती खालावल्याने त्यांनी आपल्या पत्नीच्या मदतीने अलिबागजवळ किहीमजवळ आपला मुक्काम हलवला.

## घर- उतारवयातील आर्थिक भागीदार

पुण्यात राहणारे देशमुख काका आणि काकू. वय अनुक्रमे ६५ आणि ५८. आज त्यांच्या कोथरूडमधील फ्लॅटची किंमत जवळपास ३ कोटी रुपये आहे. पण हा फ्लॅट त्यांना आयता मिळालेला नाही. चाळिशीत असताना त्यांनी Home Loan घेतल, अनेक वर्षे EMI भरले, काटकसर केली आणि शेवटी हे घर स्वतःच्या मालकीचं केलं. मुलगा अमेरिकेत स्थायिक आहे, मुलगी बंगळुरूत. दोघेही सुखात आहेत. पण देशमुख दांपत्यासमोर एक प्रश्न उभा राहिला आहे. घर आहे, पण नियमित उत्पन्न नाही. FD वरील व्याज कमी पडू लागलं आहे. वाढते वैद्यकीय खर्च आहेत. मुलांकडे मागायचे नाही आणि आयुष्याच्या या टप्प्यावर पैशांची चिंता करत बसायचं नाही. अशा वेळी त्यांना रिव्हर्स मॉर्गेज या योजनेची माहिती मिळाली आणि त्यांना जाणवलं की आयुष्यभर ज्यासाठी कष्ट केले, ते घरच आता त्यांच्यासाठी काम करू शकतं.




सामान्य माणसाने घराला नेहमी संपत्तीपेक्षा जास्त काहीतरी मानलं आहे. ते फक्त चार भिंतींचं बांधकाम नसतं. त्यात आयुष्याची कमाई, आठवणी, त्याग आणि स्वप्न गुंतलेली असतात. म्हणूनच 'घरावर कर्ज' हे शब्द ऐकले की अनेक ज्येष्ठ नागरिक घाबरतात. पण रिव्हर्स मॉर्गेज हे नेहमीच्या कर्जासारखं नाही. यात घर विकावं लागत नाही, घर सोडावं लागत नाही आणि मालकीही तुमच्याच नावावर राहते. उलट तुम्ही ज्या घरात राहता, तेच घर तुमच्या उत्पन्नाचा स्रोत बनतं. विशेषतः ज्यांना पेन्शन नाही, ज्यांची बचत कमी पडू लागली आहे किंवा ज्यांना मुलांवर आर्थिकदृष्ट्या अवलंबून राहायचं नाही, त्यांच्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरू शकते.

रिव्हर्स मॉर्गेजमध्ये तुम्ही तुमचं स्वतःचं राहतं घर बँकेकडे तारण ठेवता आणि बँक तुम्हालाच दरमहा पैसे देते. साधारणपणे ६० वर्षांवरील व्यक्ती यासाठी पात्र असतात. पती-पत्नी संयुक्त अर्जदार असू शकतात. घराची मालकी मात्र तुमच्याच नावावर राहते. देशमुख काकांच्या ३ कोटी रुपयांच्या घराचं उदाहरण घेतलं तर बँक साधारणपणे घराच्या किमतीच्या ४० ते ६० टक्के मूल्य विचारात घेते. म्हणजे सुमारे १.२ ते १.८ कोटी रुपयांच्या आधारावर त्यांना योजना मिळू शकते. प्रत्यक्ष मासिक रक्कम बँक, व्याजदर, वय आणि योजनेच्या अटींवर अवलंबून असते. पण अशा मूल्याच्या मालमत्तेवर साधारणपणे दरमहा ५० हजार ते १ लाख रुपयांच्या आसपास मासिक उत्पन्न मिळू शकतं. काही घरांसाठी ते यापेक्षा कमी किंवा अधिकही असू शकतं. मुद्दा एवढाच की आयुष्यभर कष्टाने उभं केलेलं घर आता खर्चाचं ओझं न राहता उत्पन्नाचं साधन बनतं. त्यांना आता जगभर प्रवास करायचा असेल, चांगले उपचार घ्यायचे असतील किंवा फक्त निर्धास्तपणे जगायचं त्यांच्यासाठी देखील हा एक असेल स्वतंत्र उत्पन्नाचा स्रोत तयार होतो.

या योजनेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे तुम्ही तुमच्या घरातच राहू शकता. अनेक जण म्हणतात, 'घर भाड्याने दिलं तर उत्पन्न मिळेल ना?' पण जर तुमच्याकडे एकच घर असेल तर ते भाड्याने दिल्यानंतर स्वतः कुठे राहायचं हा प्रश्न उभा राहतो. मोठ्या शहरांमध्ये मिळणारं भाडं आणि स्वतः राहण्यासाठी द्यावं लागणारं भाडं यांचा हिशोब कधीच जुळत नाही. त्यामुळे एकच घर असलेल्या आणि त्याच घरात राहून उत्पन्न हवं असलेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी रिव्हर्स मॉर्गेज हा अनेकदा अधिक व्यवहार्य पर्याय ठरतो. कारण घरही तुमच्याकडे राहते आणि त्यातून उत्पन्नही मिळतं. खरं तर ही योजना काही विशिष्ट प्रकारच्या कुटुंबांसाठी अधिक उपयुक्त ठरू शकते. मुलबाळ नसलेली दांपत्य, फक्त मुली असलेले आणि त्या आपल्या संसारात स्थिरावलेल्या पालक, परदेशात किंवा दूरच्या शहरांत राहणारी मुलं असलेली कुटुंबं, तसेच म्हातारपणी कोणावर आर्थिकदृष्ट्या अवलंबून राहायचं नाही असं ठरवलेले ज्येष्ठ नागरिक, या सगळ्यांसाठी हा पर्याय गंभीरपणे विचार करण्यासारखा आहे. कारण सर्वांची मुलं आई वडिलांना टाकून देतात्वास नसल तरी प्रत्येकाला आईवडिलांना स्वतःच्या घरी नेता येत नाही. मुलांकडे जातबपसारायला आई वडिलांना आवडत नाही. मग अशा वेळी आर्थिक स्वावलंबन हीच सर्वात मोठी सुरक्षितता ठरते.

समजा काही वर्षांनी देशमुख काकांचं निधन झालं तरी काकू संयुक्त अर्जदार असल्यामुळे त्या पुढेही आयुष्यभर त्या घरात राहू शकतात. बँक त्यांना बाहेर काढू शकत नाही. शिवाय योजनेच्या अटींनुसार त्यांना मिळणारी देयकेही सुरू राहू शकतात. त्यामुळे जोडीदार गेल्यानंतर अचानक आर्थिक आधार तुटत नाही. ही बाब विशेषतः एकट्या राहणाऱ्या ज्येष्ठ महिलांसाठी खूप महत्त्वाची आहे. पुढे काकूंचंही निधन झाल्यानंतर मुलांसमोर दोन पर्याय असतात. एक म्हणजे बँकेची थकबाकी भरून घर स्वतःकडे ठेवणं. दुसरा म्हणजे घर विकणं. समजा त्या वेळेस घराची किंमत ५ कोटी रुपये झाली आहे आणि रिव्हर्स मॉर्गेजमधून मिळालेली रक्कम व त्यावरील व्याज मिळून बँकेची एकूण थकबाकी २ कोटी रुपये झाली आहे. अशा वेळी घर विकल्यास सर्वप्रथम बँकेचे २ कोटी रुपये फेडले जातील आणि उर्वरित ३ कोटी रुपये वारसांना मिळतील. म्हणजे रिव्हर्स मॉर्गेज केल्यामुळे मुलांना काहीच मिळणार नाही असं नाही. उलट अनेकदा मालमत्तेच्या वाढलेल्या किमतीचा फायदा वारसांनाही मिळतो. जर वारसांना घर विकायचं नसेल, तर ते बँकेची थकबाकी भरून घर स्वतःच्या मालकीत ठेवू शकतात.

सिनियर सिटीझन ह्यात सहभागी झाल्यास काही घरांमध्ये वर्षातून एकदाच फोन करणारी मुलं, रिव्हर्स मॉर्गेजमधून आई-वडिलांना उत्पन्न सुरू झाल्यावर अचानक नियमित फोन करू लागतील, त्यांचं प्रेम उतू जाऊ लागेल! ह्यातील विनोद बाजूला ठेवला तर एक गोष्ट खरी आहे. ती म्हणजे म्हातारपणी सन्मानाने जगण्यासाठी पैशांची गरज असते आणि त्या पैशांसाठी मुलांकडे पहावं लागू नयेबस प्रत्येकाला वाटत असत. त्यातून प्रत्येक मुलगा 'वंशाचा दिवा' ठरेलच असं नाही. प्रत्येक मूल म्हातारपणी आई-वडिलांचा आधार बनेलच असंही नाही. पण आयुष्यभराच्या कष्टातून तुम्ही स्वतः उभं केलेलं तुमचं घर मात्र तुम्हाला कधीच सोडून जात नाही. गरज पडली तर रिव्हर्स मॉर्गेजच्या माध्यमातून तेच घर तुमच्या उतारवयाचा आर्थिक आधार बनू शकतं. आपणच तयार केलेल्या ?सेटचा आपल्या हयातीत, ताठ मनानें जगायला पुरेपूर वापर करता येतो. अनेकांसाठी खरा प्रश्न 'वंशाचा दिवा कोण?' हा नसून 'आयुष्यभर साथ कोण देणार?' हा आहे. आणि त्याचं उत्तर अनेकदा आपल्या स्वतःच्या घरातच दडलंलेलं असतं. फक्त ते अनेकांना माहीत नसतं. म्हणून हा लेखन प्रपंच.

**मंदार जोग**

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि. २० जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# आता भाडेपट्ट्यावर घेतलेल्या जमिनी सरकार घेणार परत

## आता राज्य सरकारच एकमेव ताबा धारक

प्रतिनिधी २० जून



**अकोला :** राज्य सरकारने संपादित केलेल्या शासकीय जमिनीच्या मालकी हक्काचा दावा करणाऱ्यांना तसेच वर्षानुवर्षे या जागेचा उपभोग घेणाऱ्यांना सरकारने मोठा धक्का दिला आहे. भाडेपट्ट्याच्या जमिनीच्या हक्क पत्रांमध्ये महाराष्ट्र सरकारचे नाव ताबा धारक म्हणून नोंदवले जाईल. महसूल विभागाने हा निर्णय घेतला आहे. भाडेपट्ट्याच्या जमिनीचे हक्क पत्रांमध्ये संगणमत करून आपली नावे नोंदवणाऱ्यांची नावे वगळून त्याऐवजी महाराष्ट्र सरकारचे नाव ताबा धारक म्हणून नोंदवले जाईल. महसूल विभागाने एक परिपत्रक जारी करून सर्व जिल्हाधिकाऱ्यांना राज्यभरात तीन महिन्याची विशेष मोहीम राबवून भाडेपट्ट्याच्या जमिनीवर महाराष्ट्र सरकारचे नाव ताबा धारक म्हणून नोंदवण्याचे निर्देश दिले आहेत. शासकीय जमीन व्यक्ती किंवा संस्थांना ३०, ९९, किंवा ९९९ वर्षाच्या दीर्घकालीन भाडेपट्ट्यावर दिली जाते. या जमिनीच्या ताबाधारक रकान्यात, महाराष्ट्र सरकार ऐवजी भाडेपट्टेधारकांची नावे शासनाच्या परवानगीशिवाय नोंदवली गेली आहेत. भाडेपत्तेदार त्या सरकारी जमिनीवर मालकी हक्क सांगत आहेत. त्यामुळे खाजगी मालकी हक्क संपुष्टात आणण्यासाठी सरकारने एक मोठे पाऊल उचलले आहे. आता भाडेपट्ट्यांच्या जमिनीच्या भोगवटादार रकान्यात महाराष्ट्र सरकारची नोंद केली जाईल. इतर हक्कांमध्ये भाडेपट्टी धारकाचे नाव कायम राहील.

### नोंदी अद्यावत करण्यासाठी तीन महिन्याचा अल्टीमेटम

◆ महसूल विभागाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना एक विशेष मोहीम सुरू करून सर्व सरकारी जमिनीच्या मालकी हक्काच्या नोंदीमध्ये महाराष्ट्र सरकारची भोगवटादार म्हणून नोंद करण्यासाठी तीन महिन्याचा अल्टिमेटम दिला आहे. राज्यभरातील भाडेपट्ट्यांवरील शासकीय जमिनीसाठी एकसमान आणि स्पष्ट प्रणाली तयार करण्याच्या उद्देशाने या सूचना जारी करण्यात आले आहेत. त्यामुळे शासकीय मालकीच्या जमिनी विषयी अचूक माहिती उपलब्ध होईल अनावश्यक वाद कमी होऊन महसूल व्यवस्थापन अधिक कार्यक्षम होईल.

# ‘मृग’ गेला कोरडा अन् दोन दिवसांनी आर्द्रा नक्षत्र प्रवेश!

♦ शेतकऱ्यांची चिंता वाढली, एल निनोच्या प्रभावाने शेतकरी धास्तावला



प्रतिनिधी २० जून

**अमरावती :** पावसाचे सलग दोन नक्षत्र तुरळ पावसाव्यतिरिक्त कोरडे ठण्ण गेले असून, दोन दिवसांनी म्हणजे २२ जूनपासून पावसाच्या तिसऱ्या नक्षत्रात (आर्द्रा) प्रवेश होत आहे. अद्यापही पावसाचा पत्ता नसल्याने जिल्ह्यातील शेतकरी वर्ग चिंतेत सापडला असून अल निनोच्या प्रभावाने धास्तावला आहे. मागील काही वर्षांत दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांपुढे हंगामाच्या सुरुवातीलाच आव्हान उभे राहिल्याने गावगाड्यात चिंतेचे ढग गडद झाले आहेत. खरीप हंगामासाठी पेरणीपूर्व मशागत आटोपल्यानंतर शेतकऱ्यांनी खते आणि बियाण्यांची जुळवाजुळव सुरू केली. मृग नक्षत्रात पेरणी करण्यासाठी शेतकरी सज्ज असताना पावसाने दडी मारली. २२ जूनपासून आर्द्रा नक्षत्र आहे. ‘एल निनो’ सक्रिय झाल्याने या नक्षत्रातही पावसाची आशा धूसर असल्याने शेतकरी हादरला आहे. मृग नक्षत्रात समाधानकारक पाऊस झाल्यावर केलेल्या पेरण्या साधतात, अशी शेतकऱ्यांची भावना आहे. पण गेल्या काही वर्षात मृग नक्षत्र कोरडा जात असल्याचा अनुभव आहे. गेल्या काही दिवसांत तापमान कमी झाल्याने पावसाची आशा वाढली. रोज ढगाळ वातावरण असल्याने मुसळधार पाऊस पडेल, या आशेवर शेतकरी होते. पण, पाऊस होत नसल्याने शेतकरी हादरला आहे. यातच एल निनोमुळे राज्यातील पर्जन्यमानावर मोठा परिणाम होणार आहे. कमी पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान होणार असल्याच्या चर्चेमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

# अकोल्यातील ‘द फिटनेस हब’ ला 4 वर्षे पूर्ण

प्रतिनिधी २० जून



**अकोला :** बदलत्या जीवनशैलीत आरोग्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले असून, शहरात फिटनेसबाबत मोठी जागरूकता निर्माण होत आहे. स्थानिक पातळीवर फिटनेस क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ’द फिटनेस हब’ या नामांकित जिमला यशस्वीरित्या ४ वर्षे पूर्ण झाली आहेत. या वर्धापनदिनानिमित्त जिमचे संचालक हेमंत तापडिया आणि मुख्य ट्रेनर गणेश सर गेल्या ४ वर्षांतील प्रवास, आव्हाने आणि आजच्या तरुण पिढीसाठी आवश्यक असलेल्या फिटनेस मंत्रांवर प्रकाश टाकला.

जिमच्या संचालक हेमंत तापडीया दिलेल्या माहितीनुसार, ४ वर्षांपूर्वी जेव्हा त्यांनी या क्षेत्राची सुरुवात केली, तेव्हा परिस्थिती आजच्यापेक्षा खूप वेगळी होती. त्याकाळी अकोल्यात जिम किंवा फिटनेस इंडस्ट्रीकडे व्यावसायिक किंवा आरोग्यपूरक दृष्टीने पाहिले जात नव्हते. सामान्यतः जिमला केवळ ’व्यायामशाळा’ किंवा ’आखाडा’ म्हणून मर्यादित स्वरूपात पाहिले जायचे आणि ’फिटनेस’ या संकल्पनेचा खरा अर्थ खूप कमी लोकांना ठाऊक होता. परंतु, गेल्या चार वर्षांतील सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हा दृष्टिकोन पूर्णपणे बदलला आहे. आज अकोल्यातील अनेक नामांकित आणि प्रतिष्ठित नागरिक आरोग्याप्रती जागरूक होऊन या जिमला पसंती देत आहेत. हे यश केवळ नागरिकांच्या विश्वास आणि पाठिंब्यामुळेच शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले.आज ’द फिटनेस हब’ वर्धापन दिन सोहळ्यात जिम च्या जेष्ठ सहकार्यांनी केक कटिंग केले. यावेळी मुख्य संचालक हेमंत तापडीया, मुख्य ट्रेनर गणेश सर, संकेत सावरकर,दीपक मिश्रा,करण रणपिसे,अमित खंडारे,प्रशांत वाहरूवाघ,अभिजीत वानखेडे, अभिजीत डोनोडे, सौरभ पोहणकर,वैभव इंगळे,अनिकेत अटाळकर,वैभव बुंदेले,नितेश निंबाळकर,मयूर जारंगे, महेश थोरात,अजय गवाणी,सिद्धार्थ नितीनवरे आदींची उपस्थिती होती.

### फिटनेस म्हणजे काय

गेल्या १० वर्षांपासून फिटनेस कोच आणि ट्रेनर म्हणून कार्यरत असलेल्या मुख्य प्रशिक्षकांनी आजच्या तरुणाईला एक महत्त्वाचा संदेश दिला आहे. त्यांच्या मते, सध्याच्या सोशल मीडियाच्या युगात फिटनेसला विनाकारण खूप गुंतागुंतीचे करून ठेवले गेले आहे. ’इंटरनेट आणि इंस्टाग्रामवर वेगवेगळे डाएट प्लॅन्स आणि वर्कआउट पद्धती पाहून तरुण पिढी स्वतःच गोंधळात पडत आहे आणि शरीरावर चुकीचे प्रयोग करत आहे. असे मत मुख्य ट्रेनर गणेश सर यांनी व्यक्त केले.

## आधुनिक फिटनेस संस्कृतीचा नवा टप्पा गाठला

### कौटुंबिक वातावरण ठरतेय आकर्षणाचे केंद्र

फिटनेसमध्ये झटपट परिणामांपेक्षा रोजचे सातत्य अत्यंत महत्त्वाचे आहे.प्रत्येकाने आपल्या व्यस्त दिनचर्येतून रोज किमान १ तास स्वतःच्या आरोग्यासाठी आणि व्यायामासाठी काढला पाहिजे.व्यायाम किंवा फिटनेस ही कोणत्याही एका वयोगटासाठी मर्यादित नाही. मुले, तरुण, वृद्ध आणि महिला, या सर्वांनाच निरोगी राहण्यासाठी व्यायामाची गरज आहे. बाहेरील जंक फूड पूर्णपणे टाळून, शरीराला आवश्यक असलेल्या सकस आणि पोषक आहारावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. ’द फिटनेस हब’मध्ये येणाऱ्या सदस्यांसाठी केवळ व्यायामाची साधनेच उपलब्ध नाहीत, तर येथील ’घरगुती आणि कौटुंबिक वातावरण’ हे ग्राहकांच्या विशेष पसंतीस उतरत आहे. याच विश्वासाच्या जोरावर आगामी काळातही अकोलेकरांना उत्तम आरोग्य सेवा देण्याचा संकल्प जिम व्यवस्थापनाने केला आहे.

# शिक्षक पात्रता परीक्षेसाठी जिल्हा प्रशासनाची जय्यत तयारी

## १३ हजारांहून अधिक उमेदवार परीक्षा देणार

प्रतिनिधी २० जून



**अकोला :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात येणारी महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटेट) २०२६ दि. २८ जून रोजी अकोला जिल्ह्यातील ३५ परीक्षा केंद्रांवर पार पडणार आहे. या परीक्षेसाठी जिल्हाभरातून १३,२९८ उमेदवारांनी नोंदणी केली असून परीक्षेच्या सुरळीत, पारदर्शक व गैरप्रकारमुक्त आयोजनासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक तयारी केली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी श्रीमती वर्षा मीना यांनी याबाबत आढावा बैठक घेऊन सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या असून परीक्षा प्रक्रियेदरम्यान समन्वय, सुरक्षा व शिस्तबद्धता राखण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा परिषद प्रशासन, शिक्षण विभाग, पोलीस प्रशासन, महसूल विभाग आणि इतर संबंधित यंत्रणा सज्ज करण्यात आल्या आहेत. परीक्षेच्या पारदर्शक व गैरप्रकारमुक्त आयोजनासाठी बायोमेट्रिक पडताळणी, फेस स्कॅनिंग, मेटल डिटेक्टर तसेच ँ६ आधारित थ्र्ढ्ढ ण्ण्ऊ निगराणी व्यवस्था कार्यान्वित करण्यात येणार आहे. याशिवाय जिल्हा नियंत्रण कक्ष व परीक्षा नियंत्रण कक्षामार्फत संपूर्ण प्रक्रियेवर सतत लक्ष ठेवण्यात येणार आहे. सकाळच्या सत्रात होणाऱ्या पेपर क्रमांक १ साठी ४,५५५ तर दुपारच्या सत्रातील पेपर क्रमांक २ साठी ८,७४३ उमेदवार परीक्षा देणार आहेत. परीक्षार्थ्यांनी प्रवेशपत्रासोबत वैध फोटो ओळखपत्र बाळगणे आवश्यक असून मोबाईल, स्मार्ट वॉच, डिजिटल उपकरणे अथवा अन्य इलेक्ट्रॉनिक साहित्य परीक्षा केंद्रात नेण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. दिव्यांग उमेदवारांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून लेखनिकाची आवश्यकता असल्यास संबंधितांनी पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. परीक्षार्थ्यांनी सर्व सूचनांचे पालन करून वेळेपूर्वी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

# मूर्तिजापूर येथे शेतकऱ्यांचे आंदोलन

♦ दूध व भाजीपाला रस्त्यावर फेकून केला शासनाचा निषेध

प्रतिनिधी २० जून

**अकोला :** शेतकऱ्यांची कर्जमाफी व्हावी या साठी शेतकरी नेते रविकांत तूपकर यांनी बुलढाणा जिल्ह्यात अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे, त्याच्या समर्थनार्थ अकोला जिल्ह्यातील विविध तालुक्यात शेतकरी आक्रमक झाले असून शेतकऱ्यांनी त्यांच्या आंदोलना समर्थन दिले आहे. मुर्तीजापुर येथील शेतकऱ्यांनी भाजीपाला व दूध रस्त्यावर फेकून राज्य शासनाचा निषेध नोंदविला.

अकोला जिल्ह्यसह राज्यातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी व्हावी या मागणीसाठी शेतकरी नेते रविकांत तुपकर हे बुलढाणा येथे अन्नत्याग आंदोलन करत आहेत. त्यांच्या समर्थनार्थ मुर्तीजापुर येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शेतकऱ्यांच्या वतीने भाजीपाला व दूध टाकून राज्य शासनाचा निषेध करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांनी राज्य सरकारच्या विरोधात नारेबाजी केली. जोपर्यंत शेतकऱ्यांची कर्जमाफी राज्य शासन करत नाही, तोपर्यंत अन्नत्याग आंदोलन सुरूच राहणार अशी ठाम भूमिका शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी घेतली आहे. त्यांच्या समर्थनार्थ अकोला जिल्ह्यासह संपूर्ण राज्यातील शेतकरी विविध स्तरावर आंदोलन करीत आहे. एकीकडे मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पीक संपूर्णतः जमीनदोस्त झाले त्यातच अवैध सावकाराकडून काढलेले कर्ज तसेच शासनाने दिलेलं पीक कर्ज हे फेडावं कसं असा प्रश्न शेतकऱ्यांसोबत उभा राहिला आहे. त्यातच आता नव्याने खरीप हंगाम सुरू होणार असून मागील शेत पीक कर्ज राज्य शासन माफ करेल काय याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# यवतमाळ जिल्ह्यात जून महिन्यात केवळ 23.3 टक्के पाऊस

♦ उमरखेडमध्ये सर्वाधिक, तर राळेगावात सर्वात कमी नोंद

प्रतिनिधी २० जून

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्ह्यात जून महिन्यात पावसाने अत्यंत संथ सुरुवात केली आहे. १८ जून २०२६ पर्यंत जिल्ह्यामध्ये सरासरीच्या तुलनेत केवळ २३.३% पाऊस पडल्याची अधिकृत नोंद झाली आहे. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी पावसाचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी असल्याने शेतकरी चिंतेत पडला आहे. यवतमाळ जिल्ह्यात जून महिन्याचा एकूण सरासरी पाऊस: ९८.३ मिमी नोंद केली आहे. १८ जून २०२६ पर्यंत झालेला एकूण पाऊस: २२.९ मिमी (२३.३%) गतवर्षी (जून २०२५) याच काळातील पाऊस: ३४.१ मिमी (३४.७ङ) जिल्हा प्रशासनाने जारी केलेल्या अहवालानुसार, वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये पावसाची टक्केवारी खालीलप्रमाणे आहे:

उमरखेडमध्ये सर्वाधिक पाऊस: उमरखेड तालुक्यात जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजे ३७.४ मिमी (३८.८%) पाऊस झाला आहे. त्यापाठोपाठ पुसद (३२.७ मिमी), घाटंजी (३०.९ मिमी) आणि दिग्रस (३०.८ मिमी) यांचा क्रमांक लागतो. राळेगावात सर्वात कमी नोंद: राळेगाव तालुक्यात जिल्ह्यात सर्वात कमी म्हणजे केवळ ११.३ मिमी (१०.३%) पाऊस पडला आहे. तर मुख्य यवतमाळ तालुक्यात १२.६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. इतर तालुके: नेर तालुक्यात २०.५ मिमी, बाभुळगावमध्ये १४.२ मिमी, आर्णीमध्ये ३०.१ मिमी तर महागावमध्ये २२.५ मिमी पाऊस पडला आहे. विशेष नोंद: कळंब, दारव्हा, वणी, मारेगाव, झरीझामणी आणि केळापूर या तालुक्यांची दैनंदिन आकडेवारी उशिरा प्राप्त होत असल्याने किंवा तांत्रिक कारणांमुळे या अहवालात पूर्णपणे समाविष्ट झालेली नाही.

**अमरावती विभागाची स्थिती**

संपूर्ण अमरावती विभागाचा विचार केला तर विभागात आतापर्यंत सरासरीच्या तुलनेत २१.२% (१८.८ मिमी) पाऊस झाला आहे. विभागाच्या तुलनेत यवतमाळ जिल्ह्याची स्थिती (२३.३%) किंचित बरी असली, तरी दमदार पावसाची प्रतीक्षा अद्याप कायम आहे.

# रविवारी श्रींच्या पालखीचे पंढरपूर वारी करिता प्रस्थान

प्रतिनिधी २० जून

**शेगाव :** पंढरपूर येथील आषाढी एकादशी यात्रा महोत्सवात दरवर्षी श्रींची पालखी सहभागी होते. परंपरेनुसार यंदाही श्रीसंत गजानन महाराज संस्थानच्या वतीने श्रींची पालखी ज्येष्ठ शु. ७ म्हणजेच २१ जून रोजी रविवारी सकाळी ७ वाजता प्रस्थान करणार आहे. पंढरपूर येथील आषाढी एकादशी यात्रा महोत्सवात सहभागी होण्याचे संस्थानचे हे ५७ वे वर्ष आहे. श्रींच्या पालखीत जवळपास सातशे वारकऱ्यां सह, टाळकरी, वारकरी, पताका धारी, हरीनामा च्या गजरात जय हरी विठ्ठल श्री हरी विठ्ठल नामाचा जयघोष करीत संत नगरी तून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. ज्येष्ठ शुद्ध ७, २१ जून रविवार रोजी श्रींची पालखी वि˚राया च्या भेटीला मार्गस्थ होणार आहे. टाळ, मृदंग वाजत, गाजत, शेकडो वारकरी हातात भागवत धर्माची पताका व मुखी हरी नामाचा गजर करीत श्रींच्या पालखी सह पंढरीची वाट धरतात. ३३ दिवसांचा पायी प्रवास करून श्रींची पालखी आषाढ शु. ९ म्हणजे २३ जुलै गुरुवार रोजी पंढरपूर येथे पोहोचणार आहे. श्रींच्या पालखीचा पंढरपूर पायदळ प्रवास २१ जुन रोजी श्री क्षेत्र नागझरी येथील संत गोमाजी महाराज संस्थान मध्ये महाप्रसादा नंतर सायंकाळी अकोला जिल्ह्यातील पारस येथे श्रींच्या पालखीचा रात्रीचा मुक्काम राहील. २२ जुन रोजी पारस येथून गायगाव येथे तर रात्री भौरद येथे श्रीच्या पालखीचा मुक्काम राहील. त्यानंतर अकोला येथे २३ व २४ जून असे दोन दिवस मुक्काम राहील. २५ जून रोजी सकाळी भरतपूर-वाडेगाव, २६ जून रोजी देऊळगाव (बाभूळगाव) पातूर, २७ जुन मेडशी श्री क्षेत्र डव्हा, २८ जुन मालेगाव-शिरपूर जैन, २९ जुन चिंचाबा पेन-म्हसला पेन, ३० ३० जुन किनखेडा-रिसोड, १ जुलै पानकन्हेरगाव-सेनगाव, २ जुलै श्री क्षेत्र नरसी (नामदेव) डिग्रस, ३ जुलै श्री क्षेत्र औंढा नागनाथ-जवळा बाजार, ४ जुलै हट्टा (अडगांव रंजोबा) श्री क्षेत्र त्रिधारा, ५ जुलै परभणी परभणी, ६ जुलै ब्राह्मणगाव दै’णा, ७ जुलै खळी गंगाखेड, ८ जुलै वडगाव (दादा हरी) परळी (थर्मल), ९ जुलै परळी परळी वैजनाथ,



१० जुलै कन्हेरवाडी-अंबाजोगाई, ११ जुलै लोखंडी सावरगाव - बोरी / सावरगाव, १२ जुलै गोटेगाव कळंब, १३ जुलै गोविंदपूर तेरणा सा. कारखाना, १४ जुलै किनी उपळा (माकडाचे), १५ जुलै श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर (धाराशिव) धाराशिव, १६ जुलै वडगाव सिद्धेश्वर-श्री क्षेत्र तुळजापूर, १७ जुलै सांगवी, ऊळे, १८ जुलै सोलापूर, सोलापूर, १९ जुलै सोलापूर- सोलापूर, २० जुलै सोलापूर, तिन्हे, २१ जुलै कामती खु. (वाघोली) माचनूर, २२ जुलै ब्रह्मपुरी, श्री क्षेत्र मंगळवेढा, २३ जुलै रोजी श्री क्षेत्र मंगळवेढा व रात्री श्री क्षेत्र पंढरपूर येथे श्रींची पालखी पोहचणार आहे. २३ जुलै ते २८ जुलै पर्यंत श्री क्षेत्र पंढरपूर येथे श्रींच्या पालखीचा मुक्काम राहील. श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव या न्यासाच्या श्रींचे पालखीचे दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुध्दा श्री क्षेत्र पंढरपूर पायी वारीचे प्रस्थान २१ जून रोजी शेगांव येथून होणार आहे. नियमानुसार ज्या भक्तांची श्रींचे पालखी सोबत पायी वारी करीता नोदणी झालेली नाही आणि श्रीचे पालखीमध्ये सहभागी होण्यास ज्यांना नियमानुसार परवानगी देण्यात आलेली नाही, अशा भक्तांना श्रींचे पालखीमध्ये वारकरी, टाळकरी म्हणून पालखी सोबत सहभागी होता येणार नाही. करीता सदर बाबीची नोंद घेण्यात यावी. सर्व भाविक भक्तांना विनंती व सूचित करण्यात येते की, नोंदणी झालेल्यां व्यतिरिक्त कुणालाही श्रींचे पायीवारी पालखीमध्ये वारकरी म्हणून प्रवेश करता येणार नाही, असा प्रयत्न करणाऱ्या विरुध्द नियमाप्रमाणे उचित कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी असे आवाहन संस्थानचेवतीने करण्यात आले आहे.

# बार्शीटाकळी नगरपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी २० जून

**बार्शीटाकळी :** नगरपंचायतीच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. जिल्हाधिकारी यांनी आज बार्शीटाकळी नगरपंचायतीला भेट देत विविध कामांचा आढावा घेतला. यावेळी नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील समस्या जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडल्या. विशेषतः पाणीपुरवठ्याच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यात आले. दरम्यान, नगरपंचायत कार्यालयातील वीजेच्या अपव्ययाचाही प्रकार समोर आल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. बार्शीटाकळी नगरपंचायतीअंतर्गत १७ प्रभाग असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीदरम्यान केवळ चार ते पाच नगरसेवक उपस्थित असल्याचे दिसून आले. उपस्थित नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील विविध नागरी समस्या जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडल्या.बार्शीटाकळी शहरातील सर्वात गंभीर समस्या म्हणजे पाणीपुरवठ्याची असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. शहरासाठी सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पाईपलाईन आणि पाण्याच्या टाकीचे काम एका ठेकेदारामार्फत सुरू आहे. मात्र हे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याचा आरोप करण्यात आला.

# बेस्टचा संप मिटण्याची शक्यता धूसर

प्रतिनिधी २० जून

**मुंबई:** परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतरही आज बेस्ट कर्मचाऱ्यांचा संप सुरू राहणार असल्याचे बेस्ट कृती समितीकडून जाहीर करण्यात आले आहे. जोपर्यंत मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्र्यांसोबत भेट होऊन मागण्यांविषयी लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत संप मागे घेऊन तडजोड होणार नसल्याचा पवित्रा कामगारांनी घेतला आहे, अशी माहिती बेस्ट संयुक्त कामगार कृती समितीचे उदय आंबोणकर यांनी दिली. त्यामुळे शनिवारीही संपाचा फटका नोकरदारांना बसणार आहे.

संप काळात बेस्टची अत्यावश्यक सेवा सुरळीत राहण्यासाठी बेस्ट उपक्रमाकडून मेस्मा अधिनियमांतर्गत अधिसूचना जारी केलेली असून, औद्योगिक न्यायालयानेही सदर कामगार संघटनांना व त्यांच्या सदस्यांना संप करण्यापासून मनाई केलेली असल्याचे बेस्टकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



♦ कर्मचाऱ्यांना हवे लेखी आश्वासन

प्रशासनाकडून संप काळात प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून मुंबई पोलिसांना प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता योग्य त्या सूचना केलेल्या आहेत. आगारांच्या प्रवेशद्वारावर तसेच कर्मचारी वसाहती व काही संवेदनशील ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आल्याचेही सांगण्यात आले.

संप काळात आगारांमधील अधिकाऱ्यांनी कामगारांच्या संपामध्ये सामील होऊ नये, असे आवाहन बेस्टने केले आहे.

जास्तीत जास्त बसगाड्या प्रवाशांसाठी रस्त्यावर कशा आणता येतील, यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे बेस्टकडून स्पष्ट करण्यात आले. मात्र त्यासाठीचा आराखडा कसा असेल, याबाबत बेस्टकडून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

**सार्वजनिक वाहतूक दिनाचा फज्जा**

बेस्टच्या कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बीकेसी सार्वजनिक साप्ताहिक वाहतूक दिनाचा शुक्रवारी फज्जा उडाला. बेस्टच्या मर्यादित संख्येने बस धावल्यामुळे बीकेसीतील कार्यालयात पोहोचताना प्रवाशांना प्रचंड दगदग सहन करावी लागली. बेस्ट च्या संपामुळे प्रवासी मेट्रोला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे मेट्रोच्या उत्पन्नात भर पडली आहे.बेस्टच्या संपातून तोडगा काढण्यासाठी शासनस्तरावर पावले उचलली आहेत परंतु अद्याप तरी त्यातून मार्ग निघालेला दिसत नाही. चर्चेतून समाधान झालेले नाही त्यामुळे तिढा कायम आहे. चाकरमानी तसेच मुंबईकरांचे मात्र हाल होत आहे.

# रिक्षा–टॅक्सी चालकांसाठी मराठीचे धडे सुरू, 15 ऑगस्टपर्यंत मुदत

प्रतिनिधी २० जून



**मुंबई :** महाराष्ट्रात अमराठी भाषा बोलणाऱ्या रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी मराठीचे धडे सुरू केले आहेत. १ जून ते १५ ऑगस्ट या कालावधीत त्यांना पाठ्यक्रम पूर्ण करणे बंधनकारक आहे. राज्यातील अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान मिळावे आणि प्रवाशांशी संवाद अधिक सुलभ व्हावा, यासाठी परिवहन विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. १ जून ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सर्व अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी चार तासांचा 'मराठी भाषा संवाद पाठ्यक्रम' पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. यासंदर्भातील प्रमाणपत्र नसलेल्या चालकांवर १५ ऑगस्टनंतर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमासाठी सरकारने राज्याचा मराठी भाषा विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थांची अधिकृत तज्ज्ञ संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. या संस्थांमार्फतच चालकांना मोफत मराठी भाषा प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यांच्याकडून देण्यात येणारे प्रमाणपत्रच परिवहन विभागाकडून ग्राह्य धरले जाणार आहे. 'मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात (एमएमआर) प्रशिक्षण वर्ग मोठ्या प्रमाणावर सुरू असून, त्यासाठी सुमारे ७१ अभ्यास केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. या मोहिमेला शैक्षणिक बळ देण्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषदेचे सुमारे साडेचार हजार शिक्षक प्रशिक्षण कार्यात सहभागी झाले आहेत. तसेच सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांचे (आरटीओ) अधिकारी चालकांना आवश्यक सहकार्य करत आहेत', असे परिवहन विभागाचे सहआयुक्त रवी गायकवाड यांनी सांगितले.

# एचडीआयएल गैरव्यवहारप्रकरणी मुंबई व दिल्लीत ईडीची छापेमारी

प्रतिनिधी २० जून

**मुंबई:** येस बँक आणि एचडीआयएल यांच्याशी संबंधित कथित आर्थिक गैरव्यवहार आणि मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीने मुंबई व दिल्लीतील १७ ठिकाणी छापेमारी केली. मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायदा अंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून, या छाप्यात ५० लाख रुपयांची रोख रक्कम, १० किलो चांदीचे बार, बँक लॉकर आणि अनेक महत्त्वाचे दस्तावेज तसेच डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आली आहेत.

ईडीने दिलेल्या माहितीनुसार, या कारवाईत सुरक्षा ?सेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड सुरक्षा रिअल्टी लिमिटेड, ख्याती रियाल्टर्स प्रायव्हेट लिमिटेड तसेच अन्य संबंधित व्यक्तींच्या कार्यालये आणि परिसरांचा समावेश होता. सीबीआयच्या एफआयआरवरून चौकशीची सुरुवात या प्रकरणाची चौकशी सीबीआयने दाखल केलेल्या एफआयआरच्या आधारे सुरू करण्यात आली. सीबीआयने एचडीआयएल आणि इतर संबंधितांवर २०० कोटी रुपयांचे कर्ज बेकायदेशीररीत्या मिळवून त्याचा गैरवापर केल्याचा आरोप ठेवला आहे. राकेश वाधवान, सारंग वाधवान

## वाधवान यांच्यावर नेमके आरोप काय?

यांच्यावरील आरोप नेमके काय? एचडीआयएलचे प्रवर्तक राकेश कुमार वाधवान आणि सारंग वाधवान यांनी येस बँकेचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी राणा कपूर यांच्यासोबत संगनमत करून २०११ ते २०२६ या कालावधीत मॅक स्टार मार्केटिंग प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या नावावर सुमारे २०० कोटी रुपयांची सहा कर्जे फसवणुकीच्या मार्गाने मिळविली, असे ईडीच्या आजवरच्या तपासात दिसून आले आहे. तपासानुसार, ही कर्जे ज्या उद्देशासाठी मंजूर करण्यात आली होती त्या उद्देशासाठी वापरण्याऐवजी त्यातील निधी एचडीआयएल समूहाच्या विविध कंपन्यांची देणी फेडण्यासाठी वळविण्यात आला. तसेच एमएसएमपीएलच्या मालकीच्या अनेक मालमत्ता आरोपींच्या निकटवर्तीय आणि संबंधित व्यक्तींना हस्तांतरित करण्यात आल्याचा संशय आहे. राणा कपूर यांची भूमिकाही संशयाच्या भोवऱ्यात आहे. ईडीच्या तपासात राणा कपूर यांनी एमएसएमपीएलला मिळालेल्या कर्जाची रक्कम एचडीआयएलच्या देणी फेडण्यासाठी वळविण्यास मदत केल्याचे निष्पन्न झाल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच, थकीत कर्ज लपविण्याच्या उद्देशाने हे कर्ज खाते वेळेपूर्वीच सुरक्षा एआरसीकडे हस्तांतरित केल्याचे देखील ईडीने केलेल्या तपासात समोर आले आहे.

# राज्याला पावसाची हुलकावणी, हवमान विभागाचा हादरवणारा अंदाज

प्रतिनिधी २० जून

**मुंबई :** राज्यात मान्सूनच आगमन झालं आहे. मात्र मान्सूने अजूनही पाहिजे तेवढा जोर पकडलेला नाहीये. मान्सून अद्यापही तळकोकणातच रेंगाळला असून, मान्सूनची वाटचाल मंदावली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये अजूनही मान्सूनच्या पहिल्या पावसाची प्रतीक्षा आहे. पाऊसच न झाल्यामुळे पेरण्या रखडल्या असून, शेतकऱ्यांच्या मनावर चिंतेचे ढग दाटून आले आहेत. सर्वांचेच डोळे पावसाकडे लागले आहेत. त्यात भरीस भर म्हणजे भारतीय हवामान विभागाकडून (घ्श्ऊ) यंदा पावसावर अल निनोचं सावट असेल असा इशारा देण्यात आला आहे. अल् निनोमुळे सरासरी पावसाच्या प्रमाणात घट होण्याची शक्यता आहे. दरम्यान त्यातच आता एक चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे, ती म्हणजे हवामान विभागाकडून राज्यात २० जूननंतर चांगला पाऊस होईल असा अंदाज वर्तवण्यात आला होता. मात्र आता हवामान खात्याच्या नव्या अंदाजानुसार पावसाची प्रतीक्षा अजून वाढली आहे.

**काय आहे हवामान विभागाचा नवा अंदाज?**

कोकणातील काही जिल्हे सोडता अद्यापही राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये समाधानकारक पाऊस झालेलाच नाहीये. मान्सूनच्या प्रतीक्षेत असलेल्या विदर्भाला अजूनही पावसाची वाटच पहावी लागणार आहे. पावसाळ्याच्या दिवसात उन्हाचे चटके सहन करावे लागणार आहेत. विदर्भात मान्सूनची प्रतीक्षा कायम असून, आता ही प्रतीक्षा आणखी ३ ते ५ दिवसांनी वाढण्याची शक्यता आहे, असा अंदाज नागपूर हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

मान्सून अजूनही तळ कोकणात रेंगाळला होता, पुढे सरकण्यास अनुकूल स्थिती नव्हती. मात्र आता हळुहळु परिस्थितीमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. संपूर्ण विदर्भात २५ जुलै नंतरच मान्सूनचे आगमन होईल अशी शक्यता आहे. मात्र येणारे काही दिवस तापमानाचे राहणार असून तापमान सामान्य पेक्षा जास्त राहील, असा अंदाज नागपूर हवामान केंद्राचे शास्त्रज्ञ प्रवीण कुमार यांनी वर्तवला आहे. दरम्यान उर्वरीत महाराष्ट्रात देखील येत्या २२ जूननंतरच पावसाला सुरुवात होईल, असंही हवामान विभागानं म्हटलं आहे.

जय पवार यांची प्रादेशिक हवामान केंद्राला भेट देऊन पाहणी केली. दरम्यान दुसरीकडे महाराष्ट्रात पावसाच्या आगमनास होत असलेल्या विलंबाची सद्यस्थिती आणि त्याचा राज्यावर होणारा संभाव्य परिणाम जाणून घेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जय पवार यांनी मुंबई येथील प्रादेशिक हवामान केंद्रला नुकतीच भेट दिली. यावेळी हवामान खात्याचे तज्ज्ञ बिक्रम सिंग यांनी त्यांचे स्वागत करून संस्थेच्या कार्याचा सविस्तर आढावा दिला.

या चर्चेदरम्यान पावसाच्या आगमनास होत असलेल्या विलंबामागील विविध कारणांचा तपशीलवार आढावा घेण्यात आला. यामध्ये एल निनोचा संभाव्य प्रभाव तसेच इतर महत्त्वाच्या हवामानविषयक घटकांवर चर्चा झाली. हवामान तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रात २५ जूनच्या आसपास पाऊस पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. राज्यात पाऊस पूर्णपणे सक्रिय होऊन समाधानकारक आणि सातत्यपूर्ण सुरू होईपर्यंत पेरणीसाठी घाई करू नका. घाईघाईने पेरणी केल्यास दुबार पेरणीचे संकट निर्माण होऊन, आर्थिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे हवामान खात्याच्या सूचनांचा विचार करूनच पुढील निर्णय घ्यावा असं आवाहन यावेळी जय पवार यांनी राज्यातील शेतकऱ्यांना केलं आहे.

# पायधुनीनंतर भिवंडीत शोरमा, पिझ्झा आणि फालुद्यातून विषबाधा! बाधितांचा आकडा 14 वरुन 37 वर

प्रतिनिधी २० जून

**मुंबई:** मुंबईतील पायधुनी परिसरात काही दिवसांपूर्वी अन्नातून विषबाधेच्या संशयास्पद घटनेत एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला होता. त्या घटनेची चर्चा सुरू असतानाच आता भिवंडीत आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सुरुवातीला १४ जणांना विषबाधा झाल्याची माहिती समोर आली होती. मात्र, आता हा आकडा तब्बल ३७ वर पोहोचला असून रुग्णांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भिवंडीतील खंडूपाडा परिसरातील एका शोरमा सेंटरमधून शोरमा, पिझ्झा आणि फालुदा खाल्ल्यानंतर अनेकांना उलट्या, जुलाब, पोटदुखी आणि मळमळ यांसारखा त्रास सुरू झाला. प्रकृती बिघडल्याने सर्वांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. विशेष



म्हणजे या रुग्णांमध्ये दोन लहान मुलांचाही समावेश आहे. उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत ११ रुग्ण दाखल झाले होते. त्यानंतर रात्रीभर आणि शुक्रवारी सकाळीही नवीन रुग्ण उपचारासाठी येत राहिले. सध्या रुग्णालयात ३७ रुग्णांवर उपचार सुरू असून त्यातील दोन रुग्ण बालक आहेत. काही रुग्णांची प्रकृती सुधारत असली तरी नव्याने रुग्ण दाखल होत असल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे.

रुग्णालयातील डॉक्टरांच्या माहितीनुसार, विषबाधाग्रस्तांना सलाईन, इंजेक्शन आणि आवश्यक औषधोपचार दिले जात आहेत. बहुतांश रुग्णांना लूज मोशन्स, उलट्या, जुलाब आणि पोटदुखीचा त्रास जाणवत होता. काही रुग्णांच्या प्रकृतीत सुधारणा होत असून पुढील एक-दोन दिवसांत त्यांना डिस्चार्ज दिला जाऊ शकतो. मात्र रुग्णांची संख्या वाढत असल्याने परिस्थितीवर आरोग्य विभागाकडून बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. घटनेची गंभीर दखल घेत अन्न व औषध प्रशासनाने संबंधित शोरमा विक्रेत्यावर रात्रीच धडक कारवाई केली. दुकानातील अन्नपदार्थांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आल्याची माहिती मिळत आहे. विषबाधेचे नेमके कारण काय, याचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे.

# शिवसेना काँग्रेसमध्ये विलीन होणार का? अखेर उद्धव ठाकरेंनी सस्पेन्स संपवला

प्रतिनिधी २० जून

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी शरद पवार गट काँग्रेसमध्ये विलिन होणार आहे, अशी चर्चा सुरू आहे, त्यातच शिवसेना ठाकरे गट देखील काँग्रेसमध्ये विलीन होण्याच्या तयारीत आहे, अशी देखील चर्चा सुरू आहे. दोन दिवसांपूर्वी शिवसेना ठाकरे गटात मोठी बंडखोरी झाली, ६ खासदार पक्षातून फुटले, या सर्व पार्श्वभूमीवर आता शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचं पुढचं पाऊल काय असणार? याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली होती, अखेर आज शिवसेनेच्या वर्धापनदिनानिमित्त शिवसेना ठाकरे गटाचा मेळावा पार पडला, या मेळाव्यात बोलताना उद्धव ठाकरे यांनी आपली पुढची



दिशा स्पष्ट केली आहे.

मी ज्येष्ठ शिवसैनिक आहे. कारण माझ्यासमोर शिवसेनेच्या स्थापनेचा नारळ फुटला आहे. त्या क्षणाला मी तिथे होतो. तुम्ही नव्हता. त्या नारळाचे तुषार माझ्यावर उडाले. ते तुषार मला एवढे भिजवतील की माझ्यावर शिवसेनेची जबाबदारी येईल असं वाटलं नव्हतं. मातोश्रीवर जे जळतात ठाकरे कुटुंबावर जळतात त्यांना ठाकरे कुटुंबाने काय काय भोगलं आणि काय काय केलं हे माहीत आहे का? शाहू, फुले, आंबेडकर यांनाही त्रास झाला. महात्मा फुले सावित्रीबाईंवर तर शेणाचा मार झाला. प्रबोधनकार ठाकरेंनाही काय काय भोगावं लागलं. का तर कर्मठ आणि बामणी वृत्ती होती. ते वाईट परंपरा तोडण्यासाठी उभे राहिले. घराचा पत्ता नाही. महाराष्ट्रभर फिरले. या ६० वर्षात अनेकांनी खस्ता खाल्ल्या. काही आपल्यात आहेत. काही नाही, त्यांना अभिवादन करतो. या सर्वांनी जे जे कष्ट घेतले. ते महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात दिसत आहे. हे काही संकट नाही. संकट अनेक आली, ज्यावेळेपासून आपण आपलं यश अपयश निवडणुकीशी तुलना करू लागलो तिथे फसलो. शिवसेनाप्रमुखांनी उत्तर दिलेलं आहे. इंद्रजित गुप्ता गृहमंत्री होते. एक घटना घडली. सरकार बरखास्त होण्याची शक्यता होती. ते इथे आले. इंद्रजित गुप्तांना भेटायला आम्ही आलो. त्यांचा चेहरा बुलडॉग सारखा होता. बाळासाहेब म्हणाले, तुम्ही काय कराल. माझं सरकार बरखास्त कराल. आम्ही सत्तेतासाठी जन्माला आलो नाही. सत्ता आमच्यासाठी जन्माला आली आहे. या ६० वर्षात आणीबाणी आली, तो काळ भयानक होता.

# बी.टी. सरांच्या निधनाने वैयक्तिक मार्गदर्शकाला मुकलो!

♦ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शोकसंवेदना

प्रतिनिधी २० जून

**मुंबई :** माजी आमदार, शिक्षणतज्ज्ञ आणि विविध सामाजिक प्रश्नांचे गाढे अभ्यासक, ज्येष्ठ नेते प्रा. बी. टी. देशमुख यांच्या निधनाने महाराष्ट्र एका मोठ्या संघर्षशील नेतृत्त्वाला मुकला आहे. माझ्या जीवनातील एक मार्गदर्शक मी गमावला आहे, अशी भावपूर्ण श्रद्धांजली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

आपल्या शोकसंदेशात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की, ज्यासाठी संघर्ष केला, त्यासाठी जीवन समर्पित असेच आयुष्य ते जगले. मला तर त्यांच्याकडून व्यक्तिगतदृष्ट्या खूप काही शिकायला मिळाले. त्यांचे कायमच मोलाचे मार्गदर्शन मिळायचे. राजकारण आणि समाजकारण एकच आहे, असे मानणाऱ्या पिढीचे ते नेतृत्त्व करीत होते. अमरावती पदवीधर मतदारसंघाचे विधानपरिषदेत त्यांनी पाचवेळा प्रतिनिधीत्त्व केले. प्राध्यापक, शिक्षकांच्या हक्कांसाठी तर ते लढलेच, पण अनेक सामाजिक प्रश्नांना त्यांनी विशेषत्त्वाने वाचा फोडली. एक अत्यंत अभ्यासू आणि प्रेरणादायी असे हे व्यक्तिमत्त्व होते. विधानपरिषदेतील त्यांची भाषणे ऐकत रहावी वाटायची. ती आजही नवीन सदस्यांसाठी प्रेरणादायी आहेत. विदर्भाच्या अनुशेषाविरोधात त्यांनी दिलेला लढा अत्यंत मोलाचा होता. मला आजही आठवते, सरकारी दरबारी भांडून न्याय मिळत नाही, म्हणून त्यांनी अनुशेष निर्मूलनासाठी थेट हायकोर्टात याचिका केली होती. सुनावणीच्यावेळी बी.टी. सरांसोबत मीही उपस्थित राहत होतो. सिंचन, पेयजल योजना यासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. अमरावती विद्यापीठाच्या निर्मितीत सुद्धा त्यांचे योगदान होते. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.

# सरकारी जागेची परस्पर मालकी नोंदवणाऱ्यांना दणका

प्रतिनिधी २० जून

**मुंबई :** राज्यात मोठ्या संख्येने असलेल्या भाडेतत्वावरील शासकीय जमिनीवर स्वतःचीच मालकी सांगणाऱ्या संस्था, कंपन्या, प्राधिकरणे तसेच व्यक्तींना फडणवीस सरकारने मोठा दणका दिला आहे. आता अशा सर्व भाडेपट्ट्यावरील जमिनींच्या अधिकार अभिलेखात 'कब्जेदार' म्हणून केवळ 'महाराष्ट्र शासन' हीच नोंद करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. महसूल विभागाने याबाबत परिपत्रक जारी केले असून, संपूर्ण राज्यात पुढील तीन महिने विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे. त्यात अशा नोंदी तपासून त्या कब्जेदार म्हणून महाराष्ट्र शासनाच्या नावावर करण्याचे निर्देश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.शासनाकडून अनेक व्यक्ती किंवा संस्थांना ३०, ९९ किंवा ९९९ वर्षांच्या दीर्घ मुदतीसाठी जमिनी भाडेकरारावर दिल्या जातात. मात्र, या जमिनींच्या कब्जेदार रकान्यात ( सदरी ) रमहाराष्ट्र शासनाच्या नावाऐवजी शासनाच्या परवानगीशिवाय भाडेपट्टा धारकांचीच नावे लागल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास आला आहे. तत्कालीन अधिकारी व

## भाडेपट्टा नोंदीवर आता 'महाराष्ट्र शासन' कब्जेदार!

कर्मचाऱ्यांनी रीतसर नोंदी न घेतल्याने, अनेक भाडेपट्टाधारक या सरकारी जमिनी स्वतःच्याच मालकीच्या ( खासगी ) असल्याचे गृहीत धरत आहेत, ज्यातून अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्भवत आहेत. हा 'खासगी' मालकीचा खेळ मोडून काढण्यासाठी आता सरकारने थेट कारवाईचा बडगा उगारला असून, भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनींच्या अधिकार अभिलेखातील कब्जेदार सदरी आता केवळ महाराष्ट्र शासनाच्या नावाची नोंद असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**भाडेपट्टाधारक आता 'इतर अधिकारात'**

भाडेपट्टाधारकाचे नाव, भाडेपट्ट्याचा कालावधी आणि ज्या अटींवर जमीन दिली आहे, त्याची नोंद आता 'इतर अधिकार' या सदरी घेण्यात येईल.तीन महिन्यांचा अल्टीमेटम सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ विशेष मोहीम हाती घेऊन, रितसर कार्यपद्धती अवलंबून अवघ्या तीन महिन्यांत या सर्व अद्ययावत नोंदी घ्याव्यात. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंमलात येण्यापूर्वी कोणत्याही कायद्याखाली कायमस्वरुपी अथवा नूतनीकरणाचा पर्याय देऊन ५० वर्षांच्या मुदतीसाठी दिलेल्या भाडेपट्ट्यांना संहितेच्या कलम २९ (३) क नुसार 'भोगवटादार वर्ग-२' च्या तरतुदी लागू होतील. जिल्हाधिकाऱ्यांनी अशा भाडेपट्टा सदरी ३० दिवसांच्या आत 'भोगवटादार वर्ग-२' अशी नोंद घेऊन शासनाला अहवाल सादर करण्याचे स्पष्ट आदेश महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिले आहेत. मुंबई शहरासाठी लागू असलेल्या नियमांनुसार, अस्तित्वात असलेल्या सर्व पट्ट्यांच्या हस्तांतरणाच्या निर्बंधांबाबतच्या नोंदीदेखील मुंबई शहरातील शासकीय जमिनीच्या अधिकार अभिलेखात तात्काळ घेण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. त्यामुळे मोक्याच्या ठिकाणी असलेल्या सरकारी जमिनींवर मालकी हक्क सांगणाऱ्यांना आता चांगलाच चाप बसणार आहे. 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महसूल प्रशासन अधिक पारदर्शक, अचूक आणि नागरिकाभिमुख करण्यावर भर दिला जात आहे. शासकीय भाडेपट्टा जमिनींच्या नोंदींबाबत राज्यभर एकसमान आणि स्पष्ट प्रणाली निर्माण करण्यासाठी हे निर्देश जारी करण्यात आले आहेत. यामुळे शासनाच्या मालकीच्या जमिनींबाबतची माहिती अधिक अचूक होईल, अनावश्यक वाद कमी होतील आणि महसूल व्यवस्थापन अधिक सक्षम होईल असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

# मुंबई शहरावर जलसंकट

प्रतिनिधी २० जून

**मुंबई :** पावसाच्या लांबणीमुळे आणि मान्सूनपूर्व उशीरा झालेल्या आगमनामुळे पाणीसाठा चिंताजनक पातळीवर (सुमारे १०-१३ टक्क्यांच्या आसपास) घसरला आहे। परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने कडक पावले उचलत पाणीपुरवठ्यात कपात केली असून बांधकाम साइट्स व स्विमिंग पूलचा पाणीवापर तात्पुरता थांबवला आहे. मुंबईला दररोज पाणी पुरवठा करणाऱ्या सात प्रमुख धरणांमधील पाणीसाठा वेगाने कमी होऊन तो १० ते १३ टक्क्यांच्या दरम्यान पोहोचला आहे।पाणी कपात: तलावांतील घटत्या साठ्यामुळे पालिकेने मुंबईत १० टक्के पाणी कपात लागू केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135